# अखेर कवितेने गाठलेच!

प्रल्हाद जाधव

## प्रस्तावना

मी साहित्याचा विद्यार्थी, त्यामुळे कविता या ना त्या मार्गाने  सोबत होती. मी मात्र कायम तिच्यापासून चार हात दूर राहायचो. तिच्या डोळ्यात डोळे घालून बघण्याचे धाडस नव्हते. मनात एक प्रकारचा धसका होता. केशवसुत म्हणायचे की 'कविता म्हणजे वीज, ती हातात धरू पाहणारे शेकडा नव्व्याण्णव जळून जातात.' ते कायम डोक्यात होते. 'रोजच्या जगण्याचे उर्ध्वपातन होऊन एखादी ओळ सुचली तरी खूप झाले' असे काहिसे भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले आहे.अशी उद्धरणे ऐकून, वाचून मी कवितेच्या बाबतीत अधिकच सावध होत होतो. खरे सांगायचे तर कवितेसाठी आवश्यक असणारा वेळ देण्याची, आयुष्य पणाला लावण्याची माझी तयारी नव्हती. मनात पडलेला कवितेचा स्फूल्लिंग पूर्णपणे फुलू देण्याची तयारी नव्हती. तितका संयमही नव्हता. मात्र तिचे निरीक्षण,वाचन,अभ्यास मनापासून आणि उत्साहाने करत होतो.

सुरक्षित सरकारी नोकरीच्या पाशात मी स्वेच्छेने शिरलो होतो; कवितेपासून दूर जाण्याचे हे कदाचित एक कारण असावे. पण असे असले तरी नोकरीतील लेखनातही या ना त्या रूपाने ती शिरकाव करीत आहे असे हळूहळू लक्षात येऊ लागले. जणू माझ्यातून व्यक्त होण्यापासून मी तिला थांबवू शकत नव्हतो. नोकरीत करावे लागणारे क्रिएटिव्ह स्वरूपाचे काम आणि अन्य तत्सम लेखनातून मी अनेकदा काव्यात्म पद्धतीने व्यक्त होत होतो. माझे तसे व्यक्त होणे सर्वांना आवडतही होते. कदाचित त्यातूनच कळत-नकळत माझे आणि माझ्या काव्यजाणिवांचे भरण-पोषण होत असावे!पण ते सगळे लेखन बौद्धिक आणि व्यवहारीक पातळीवर घडत होते. अंतःकरणात धडका मारणारी कविता ही काहीतरी वेगळीच चीज आहे हे विसरता येत नव्हते.

मी जेथे नोकरी केली त्या अवाढव्य आणि अजस्त्र शासकीय यंत्रणेत कवितेचे स्थान नगण्य! कधी संबंध आलाच तर एखाद्या कवितेमुळे उद्भवलेला वाद समजून घेत संबंधित विभागाला अभिप्राय देण्यापुरता,त्या प्रकरणी 'चौकशी'पुरता किंवा त्या निर्विकार भोवतालातील उथळ काव्यजाणिवांना अगतिकपणे सामोरे जाण्यापुरता! पण असे असूनही अधुन-मधून कविता अनावरपणे साद घालत असायची. हाताला धरून लिहिते करायची... कधी मी कवितेच्या तर कधी कविता माझ्या पायात घोटाळात होती. कधी मी तिला तर कधी ती मला फाडूनही टाकत होती. आम्ही एकमेकांना दूर करू शकत नव्हतो. उलट या 'लव्ह-हेट रिलेशनशिप'मुळेच आमच्यात एक अर्थपूर्ण नाते निर्माण झाले असावे असे आता वाटते.

या कविता पुस्तकरुपाने एकत्रित पाहताना लक्षात येते की मी कवितेपासून दूर जाण्याचा प्रयत्न करत होतो पण तिने माझे बोट कधीच सोडले नाही. किंबहुना पराकोटीच्या भावनिक क्षणी चांगल्या कवितेच्या वाचन-चिंतनावरच माझे जगणे सुरू होते. त्यात ज्ञानेश्वर-तुकाराम तर होतेच पण अरुण कोलटकर,भालचंद्र नेमाडे, मनोहर ओक, नामदेव ढसाळ, अशी मंडळी होती. केशवसुत, मर्ढेकर, डहाके, रेगे तर अभ्यासातच होते. नव्या पिढीतील अनेक कवींच्या कविताही अधूनमधून माझी तल्लफ भागवत होत्या. त्यात मंगेश नारायणराव काळे, हेमंत दिवटे, अशी अनेक नावे होती. त्यांच्या व्युत्पन्न, दमदार, आणि काळाच्या कसोटीवर टिकून राहणाऱ्या कवितांमधूनच मला जीवनरस प्राप्त होत होता. कवितेनेच माझ्या जगण्याच्या पडझडीला अनेकदा टेकू लावले, जगायला सामर्थ्य दिले याची जाणीव मनात जागी हृती.

नवी-जुनी अशी खूप कविता सतत वाचत राहिल्यामुळे आपल्याकडे नवीन काही सांगण्यासारखे नाही असे वाटायचे. 'आपण कविता लिहिली नाही तरी काही बिघडत नाही' असाही विचार मनात यायचा. पण तरीही अनिवार्य ऊर्मीपोटी कधीतरी मी कविता लिहीत होतो. पुढे ती  बाजूला ठेवून देत होतो. अशा काही कविता माझ्या संग्रही आहेत हे जवळच्या काही मित्रांना माहीत होते. त्यांतील एक म्हणजे सुप्रसिद्ध कवी मंगेश नारायणराव काळे. त्यांचा आणि माझा पस्तीस वर्षांचा जुना परिचय. ते

कवी म्हणून घडत होते तेव्हा मी त्यांना जवळून पहात होतो. त्यावेळी एकूणच कवितेच्या अनुषंगाने आमची बरीच चर्चा होत असे. त्यातूनच त्यांचे आणि माझे मैत्र जुळले. पुढे आम्ही दोघेही कामधंद्यानिमित्त वेगवेगळ्या दिशांनी गेलो. पण मंगेश माझ्या कवितांवर लक्ष ठेवून असत. अधूनमधून विचारपूस करीत.पुढे कवी, प्रकाशक, चित्रकार आणि संपादक म्हणून त्यांचे चांगले स्थान निर्माण झाले. तरी ते मला विसरले नाहीत. उलट एकदा खूप मागे लागून त्यांनी आस्थेवाईकपणे माझ्या दहा-पंधरा कविता त्यांच्या 'खेळ'मध्ये छापल्या. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. 'आपण तुमचा कवितासंग्रह काढू' असे म्हणत त्यासाठी दहा-पंधरा वर्षे माझा पाठपुरावा करत राहिले... अखेर कोरोनाने दिलेल्या निवांतपणात जुनी कागदपत्रे चाळत असताना मिळतील त्या कविता एकत्र केल्या आणि त्यातल्या काही या संग्रहासाठी निवडून त्यांच्याकडे पाठवल्या...आणि अशा तऱ्हेने शेवटी कवितेने मला गाठलेच! तिच्या माझ्या लपंडावातील काही चुकार कवितांचा हा संग्रह...नोकरीत सतत होणाऱ्या बदल्या आणि धावपळीत अनेक कविता हरवून गेल्या.काही अर्धवट लिहिल्या गेल्या तर काही मनातच राहून गेल्या...असो!

मी कवितेला दूर करत होतो पण ती सावलीसारखी माझ्या सोबत राहिली. मी अमान्य करत होतो पण ती मला सुखदुःखात आधार देत राहिली. शेवटी मी तिचे स्वागत केले आणि आज तिच्या ऋणातून मुक्त होत आहे.
एक-दोन अपवाद वगळले तर गेल्या ३०-४० वर्षात या संग्रहातील कविता कुठेही प्रसिद्ध झालेल्या नाहीत. तसेच कोणत्याही व्यासपीठावरून यातील एकाही कवितेचे वाचन झालेले नाही हे येथे मुद्दाम नमूद करीत आहे.

यानिमित्ताने येथे मला एक सांगावेसे वाटते : संकोची आणि भिडस्त स्वभावाचे कवी, चित्रकार, गायक, विविध प्रकारची कौशल्ये असणारी अनेक माणसे आपल्या आजूबाजूला असू शकतात. त्यांचा शोध घेऊन त्यांना पुढे आणणे साहित्य-संस्कृतीच्या सकस वाढीच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसे ते काही प्रमाणात आपल्याकडे होतही असेल पण तो आपल्या जीवनपद्धतीचा भाग झाला पाहिजे. 'ज्याच्या हाती ससा तो पारधी' असे चित्र निदान प्रतिभेच्या क्षेत्रात तरी दिसू नये. नाहीतर घाण्याच्या बैलासारखे आपण एकाच ठिकाणी फिरत राहू. 'अहो रुपम अहो ध्वनी'च्या आत्मलुब्ध प्रवृत्तीचे बळी ठरू...

मंगेश नारायणराव यांची भेट झाली नसती तर या कवितांना 'दिवसाचा उजेड' कधी दिसला नसता. त्यांनी कवितांची निवड, डागडुजी, मांडणी, मुखपृष्ठ,रेखाचित्रे आणि एकुण पुस्तकाच्या निर्मिती-प्रक्रियेत मनापासून लक्ष घातले म्हणून हा संग्रह इतक्या देखण्या स्वरूपात आज आपल्यापुढे येत आहे.या पार्श्वभूमीवर मंगेश नारायणराव आणि 'कॉपर-कॉइन'चा मी खूप खूप आभारी आहे.

जिने मला आयुष्यभर उत्तम साथ दिली, मला सहन करत, सांभाळून घेत माझ्यातील निर्मितीप्रेरणा जाग्या राहाव्यात म्हणून कळत-नकळत सजग राहिली त्या माझ्या पत्नीला; सुरेखा ऊर्फ रेखाला हा माझा एकमेव, पहिला आणि शेवटचा कविता-संग्रह अर्पण करीत आहे. मंगेश नारायणराव यांच्या मते 'शेवटचा कविता संग्रह' ही अफवा असते... तसे जर असेल तर पुन्हा अशा पद्धतीने भेटणे शक्य होईल की काय हे काळच ठरवेल. येतो, नमस्कार!

-प्रल्हाद जाधव
१४ मार्च २०२३.

**अंतरंग**


- दिलासा
- खोल खोल
- कागदाचे तुकडे
- ही कविता
- विरामचिन्हे
- आदेश
- नव्या नोकरास
- निवृत्त?
- पुस्तका
- समतोल
- विचार
- लता
- गुहेत
- मी आणि तू
- होडी
- होडी-२
- जात
- आजोळ
- लाहोरी
- गोड घास
- पडला पाऊस
- भर दुपारी
- इच्छांच्या माथ्याला
- अभंग
- शेजारची बाई
- मासा
- चित्र
- स्पंदनाच्या अल्याड-पल्याड
- निष्प्राण अंगाई
- हद-बेहद
- ढग
- नेणिवेतल्या फुलांची ओंजळ
- पुतळा
- ही अंधारी गुहा
- मी तूच!
- टायगर शो
- थोडी मिसळ
- जसे आहोत तसे
- आवरायला हवे
- नागावकर गेले
- कवी पत्नीचा शोकसंदेश
- तुकाराम सरांच्या शाळेत
- वाऱ्याचे घर

दिलासा

मी कविता लिहित होतो
की कविता मला लिहित होती
काहीच आठवत नाही,
पण दोघांचेही ते काम
अपूर्ण राहून गेले हे सत्य आहे...

कवितेचे मूल होऊन
तिचे दूध पिता पिता
मी नकळत झोपी गेलो
आणि तीही
लिहिण्याचे विसरून
मला दूध पाजण्याच्या त्या वत्सल क्षणांत
शिल्पांतरित होऊन गेली !

न लिहिली गेलेली ती कविता
एखाद्या अभ्यासक्रमात लागणे
किंवा तिची समीक्षा केली जाणे
अर्थातच शक्य नाही...

उलट तेवढा एक दिलासा आहे
विस्मरणाच्या डोहाकाठी !

* * *

खोल खोल...

आता मी माझ्यात राहू शकत नाही हे ओळखून
बाहेर पडू पाहतो आहे पराकोटीच्या निर्धाराने...

बाहेर पडताना
मला येथील सारे संदर्भ,संस्कार, नातीगोती,
जमीनजुमला सारे सोडावे लागणार आहे
आणि त्याची  मी पूर्णपणे तयारी केली आहे.

मी माझ्यातून बाहेर पडताना

दुसरा एकजण
दाराच्या फटीतून लक्ष ठेवून असणार आहे
माझ्या हालचालींवर.
तो दुसरा कोण आहे,
तो माझ्यावर का लक्ष ठेवणार आहे,
आणि ते दार त्याच्याच घराचे असेल का,
याचा विचार या क्षणी मी करत आहे.

कदाचित तो दुसरा
म्हणजे मीच असेन माझ्याच विस्मरणात गेलेला
ज्याच्या घराला दरवाजा असेलच असे नाही,
त्याचे घर असेलच असेही सांगता येत नाही.

ज्या  दुसऱ्या 'मी'ला मी माझा समजत आहे
तो तिसऱ्याच कोणाचा तरी असू शकतो
आणि त्याच्या मनात,
आपण अन्य कोणाचे तरी आहोत असा विचार
येऊ शकेलच असेही नाही,
त्याला मन असेल का नाही,याचीही हमी देता येत नाही.

मी माझ्यातून बाहेर पडू इच्छितो असे म्हटले
पण ते उलट करून,
मी बाहेरून आत जाणार आहे असे का म्हणत नाही ?
किंवा
मी आधीच मुक्त होतो आणि आता बद्ध होणार आहे,
असे म्हटले तर काय फरक पडतो ?
किंवा मला बद्ध वा मुक्त होण्याची गरजच काय ?
किंवा या दोन्हींच्या पलिकडे तिसरी शक्यता नाही का?
आणि मी जर मला सोडून जाणार हे नक्की असेल तर
पुन्हा मी ला माझ्यासोबत घेणे चुकीचे होणार नाही काय?

एखादे  श्वापद तडफडावे पिंजऱ्यात अनंत काळापासून
तशी तडफड सुरू आहे माझी, अशा अनेक प्रश्नांमुळे.
साऱ्या शृंखला तोडून
आणि विप्रश्न होऊन मला पडायचे आहे बाहेर
पण शृंखला तोडू पाहणे आणि विप्रश्न होऊ पाहणे
हीसुद्धा एक प्रकारची आसक्तीच नाही काय?

शिवाय मी बाहेर पडताच
मला गिळण्यासाठी इतर अनेक सापळे बाहेर
तयार असणार नाहीत कशावरून ?

मला कशासाठी बाहेर पडायचे आहे,
हाही प्रश्न अनुत्तरीतच आहे या क्षणी.
शिवाय मला म्हणजे कुणाला ?
कशासाठी म्हणजे काय ?
बाहेर म्हणजे कुठे?
म्हणजेचा अर्थ काय ?
काय म्हणजे नेमके काय?

की हे सारे सोडून
जेथे आहे त्या क्षणातच स्थित राहण्यात
शहाणपण आहे?

* * *

कागदाचे तुकडे

१.
सुरळी करून कानात घालावा काळजीपूर्वक
शिक्का मारून पेटीत टाकावा मुर्दाबाद
दोर बांधून आकाशात उडवावा गोते
कव्हर घालून इतिहास जपावा वाळवी
सेंट मारून संदेश पाठवावा लफडे
मुतात बुडवुन मॅच करावा डायबिटीस
पत्ता लिहून पोस्टात टाकावा वैताग
भोक पाडून प्रवास करावा पर्फोरेटेड
ढुंगण पुसून कमोडमध्ये टाकावा अंतर्धान
फ्रेम करून भिंतीवर लावावा स्मृतिस्थळ
ब्रीफकेस मधून बेकार फिरवावा पायपीट
कुशल चिकटवून डोसा खावा नउधार
स्वतःला गुंडाळून झुरका मारावा ॲशलेस...

२.
कागदाचा ग्लोब कागदी नकाशा
कागदी सावल्यांचा रोजचा तमाशा
कागदाचे कार्यालय कागदाची दारे
कागदाच्या खिडकीतून कागदाचे वारे
कागदाच्या घरात कागदी बिछाना
कागदी बिछान्यावर कागदाची मैना
कागदी श्रृंगारामध्ये कागदाची उशी
कागदी अपत्याची कागदावरच शी
कागदाची संस्कृती कागदाचा इतिहास
कागदाच्या कैद्याला कागदाचा गळफास

३.
काल काकूंनी
काकांचे कपाटातील कवितांचे कागद
कात्रीने कराकरा कापून
गॅलरीतून खाली फेकून दिले
ते तसेच हवेवर तरंगत वर येऊन
आपल्या सपाट कुल्ल्यांनी वाकुल्या दाखवत
काकूंना पुन्हा बिलगू लागले
काकूंनी ते कपटे एकत्र करून
काडेपेटीतील काडी काढून कचकन पेटवून
जाळून त्यांचा कोळसा केला...
हे जेव्हा काकांना समजले तेव्हा त्यांनी
तीच कातर आणि कायदा हातात घेऊन
काकूंचे नाक आणि त्यांच्या संतापाचा अनुप्रास
कम्प्लीट कापून काढत असल्याची कल्पना केली!

४.
टिपणी आली गोळीगत सू सू
पत्र आले चाकूसारखे खट्टयाक्
मेमो आला वस्तऱ्यागत बिनपाण्याने
वृत्तपत्रे झेपावली भाल्यासारखी
जी.आर.च्या गठ्ठयांनी वाढवल्या भिंती
ड्रॉवरमध्ये चहाच्या बिलांचा सुळसुळाट
दैनंदिनीतील महत्वाच्या नोंदी अस्तनीतील निखारे
टेबल-डायरीचे फडफडते पान रिमाईंडर

कॅलेंडरवरच्या लाल तारखा खुनशी व्हीआयपी
टेबलावरचे उडते टपाल - कारस्थानी
पेंडिंग प्रकरणांचे गठ्ठे - दारुगोळा!

चिठ्ठ्या आल्या :
मंत्र्यांच्या बेकायदेशीर
साहेबांच्या कायदेशीर बेकायदा
मंत्र्यांच्या पीएच्या तात्काळ कार्यवाही
खालच्यांच्या कचऱ्याची टोपली
वरच्यांच्या विचाराधीन.

फॅक्स आला :
नखरेल बाईसारखा हळूहळू अक्षरांशी नाते तोडत पुसट होत जाणारा बेईमान मनस्ताप

डॉक्टरांचे बिल आले फाइल-सेल्स वाढल्या
मृत्युपत्र आले पांढरे निशाण
कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट प्रकरणाची फाईल घेऊन जाताना धावपळीत धडाऽऽऽम, आत्मसमर्पण!

५.
अशी कल्पना करू या
की पृथ्वी ही एक चहाची किटली आहे
तिच्यावर
आकाशाच्या कागदाची टोपी
घालून ठेवली आहे कवी येतो
आकाशाची टोपी काढतो
पृथ्वीच्या किटलीतील चहा पितो
आणि आकाशाच्या टोपीने तोंड पुसून
कागदाचा गोळा फेकून देत
पुन्हा कविता लिहायला बसतो...

६.
कागदा कागदा माझी पाठ सोड वाट सोड
झिजली माझी रेखेची वहाण
जीव गहाण ठेवून फिरलो न्हाण आल्यापासून
आता संपला रस्ता
आले अखेरच्या मुक्कामाचे ठिकाण

तुला कितीदा फाडला
तरी आलास पुन:पुन्हा वाकुल्या दाखवत सपाट कुल्ल्यांच्या
धुंडत मला त्रिखंड आणि कितीदा फाडून भस्म केला तरी मनात उरलास विविधतेतही एकात्मता टिकवणाऱ्या महान भारतासारखा अखंड.

आजवर चाटत आलो तुझी एकमिती मांडी
माझ्या फाउंटनच्या जिभेने
आणि चालवले तुझ्या विराण छातीवर
पेन्सिलींचे नांगर दिवसा-रात्री
पहात स्वप्ने केसाळ काळ्या अक्षरांच्या
वांझोट्या तुरुंगातील
बंदिवान कवितेच्या सुटकेची...

मला बेसावध ठेवून संमोहित करून
भ्याड नीतीने लढलास माझ्याशी शालेय जीवनापासून लावत आग माझ्या रोजच्या जगण्याला
ज्याचा बदला घेण्यासाठी आणि तू निर्मिलेला घृणित इतिहास छाटण्यासाठी
आता मी आहे लावीत धार
माझ्या लाडक्या खोडरबराला...

तू असाच वरचेवर शब्दांकडून
स्वतःला बडवून घेत राहशील पाठपोट रे पांढऱ्या बैला
छिन्नीच्या सृजनात्मक घावांना सामोरा जाणारा मुका दगड तुझ्यापेक्षा कितीतरी चांगला!

७.
शब्दांना माहीत नसते
की आपण राक्षसाच्या अंगावर खेळत आहोत
आपल्या शब्दांची कोवळी मुले चवीचवीनं खात राहतात
कागदांचे राक्षस.
आपला श्वास रोखून निर्भयपणे वावरू देतात शब्दांना आपल्या अंगाखांद्यावर
आणि लहर आली
की वत्सल भाव डोळ्यात आणून
करतात त्यांचा चट्टामट्टा!

८.
कागदाची सुसर
स्तब्ध अविचल सावधचित्त असते
एकही तरंग उठणार नाही कवितेच्या डोहात

याची काळजी घेत
आणि एकदा का शब्द तिच्या टप्प्यात आला
की त्याची तंगडी पकडून त्याला खोलवर नेते
आणि तेथील एखाद्या कपारीत अडकवून
येता-जाता खात राहते
रडत रडत...

९.
कागदाच्या जाळ्यात अडकल्यानंतरच
अक्षरांच्या लक्षात येते
कागदी कोळ्याचे कारस्थान
कागदाचा कोळी मग
शब्दांना प्राणांतिक धडपडत ठेवून
मस्तपणे शोषत राहतो शाईचे रक्त!

१०.
अपूर्ण कवितांच्या पायवाटा
आणि त्यावर विखुरलेली वेडीवाकडी विरामचिन्हे
हा असतो पडक्या वाड्याचा रस्ता...

हरवलेले कागद होतात इतिहासाला फितूर
त्यांच्यावर उभारलेली शब्दांची पडकी स्मारके
गडप होतात काळाच्या पोटात
त्यातील काही होतात रूपांतरित वाफेत
किंवा मातीचा थर वाढविण्यास कारणीभूत...
म्हणून कधी लिहूच नये
गनिमी काव्याने सामोऱ्या येणाऱ्या
कागदाच्या कारस्थानाला फसू नये
दप्तरखाना जाळला जाईलच याची खात्री बाळगू नये!

११.
जीवापाड जपलेले कागद पडलेले असतात
घरात कपाटात माळ्यावर बॅगांमध्ये फाईलींमध्ये
जागा मिळेल तेथे.
एखादा कपटा सापडतो जुन्या पँट-शर्टाच्या खिशातही जोडणारा तोडणारा जगवणारा मारणारा...
काही कागद अपुऱ्या कवितांचे, काही कागद
मजकूर-दुरूस्तीच्या प्रतीक्षेतले !

अमुक कागद अमुक ठिकाणी असल्याची खात्री
मोठी दिलासादायक असते
पण तीही कागदाची एक कपटनीती असते...

१२.
वाळवीचे कर्तृत्व नाकारण्यात
कवी फार मोठी चूक करत असतो
(अर्थात हे स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याचा विचार
हाही एक गाढवपणाच!)
वाळवी कवीला पुरेपूर संधी देत
आपल्या औदार्याचे दर्शन घडवते
पण कवी नेहमीच बेसावध राहतो
आणि कविता लिहून
आपल्या विनाशाला आमंत्रण देतो...

कवीने
आयुष्यभर जपलेल्या कवितांच्या ढिगाऱ्याखालून
वाळवी आपल्या सृजनाला सुरुवात करते
घालत जाते शिस्तशीर रांगोळी नेटाने
तिच्या प्रतिभेचा मृत निर्झर लयदार प्रवास करत
उमलतो गठ्ठयाच्या वरच्या बाजूला अपूर्व नक्षी दर्शवत :

एखादी अनवट पायवाट, काही चांदण्या, एखादी चंद्रकोर,
एखादी अज्ञात आकाशगंगा, प्रथमच आढळून आलेल्या
नव्या आकाशगंगेचा झगझगीत मार्ग
आणि कागदाच्या पापुद्र्यागणिक खुललेली
वाळवीची अनन्यसाधारण प्रतिभा
कवीला विनासमीक्षा पहावी लागते

वाळवीची शुभ्र स्वच्छ नितळ संगमरवरी पौष्टिक सेना
कागदाच्या रक्तवाहिन्यांवर बेमालूम हल्ला करते
अक्षरांची शरीरे कुरतडत हळूहळू नि:संदर्भ करीत जाते
कवीच्या चुकांचे पुरावे अपूर्व कलाकसरीसह...

कवीचा पाठलाग करते वाळवी पुनःपुन्हा...
शवपेटीच्या दगडी लगद्यात वाळवी लागलेला
कवीसुद्धा उठून बसतो पुन:पुन्हा!

१३.
कागदाच्या पोटातच
वाळवीचा संभव असतो
कवितेचे दिवस भरताच
कागद वाळवी प्रसवतो

१४.
कवी समजतो
की आपण लिहितो
पण लिहून घेणारा कागद असतो
खरे तर कागद कवीकडून
त्याच्या पेनाने
आपली पाठ खाजवून घेत असतो

१५.
मॉनिटरवरची रेषा ठुमकत पुढे आली
वळली, तिचे पोट दिसले, पाठ दिसली
नंतर तिने काढून दाखवली आपल्यातून लांबी रुंदी उंची आणि काही नवी परिमाणे
नंतर तिचे वर्तुळ झाले वर्तुळातून त्रिकोणातून चौकोनातून षटकोन
आणि रंगीबेरंगी विभ्रमांचे अगणित आकार वंशविस्तार!

नंतर ती आली पोकळ होऊन सळसळत
आतल्या भिंती दाखवत
बीऽऽप बीऽऽप अशा आवाजापाठोपाठ सूचना मिळाली म्हणून
कळ दाबली तर प्रिंटर बाळंत झाला कागद
सरसर वेणा सुखरूप!

१६.
सपाट पडद्यावरची त्रिमित परिमाणे
बाजारपेठ काबीज करताना
कागदाचा हमाल
कवीच्या डोळ्यात टोच्या खुपसून
दृष्टीकोनाचा मूठभर नमुना बाहेर काढतो
कवी म्हणजे काळाच्या लेखी
केवळ एक एरर असतो...

***

ही कविता...

ही कविता
फाडून टाकलेल्या नकली कवितांच्या
प्रमाथी आठवणींना...

ही ओळ
हरविलेल्या कवितांसोबत हरवलेल्या
बेभान क्षणांना...

ही ओळ
कागदांच्या प्रचंड पसाऱ्यात
शोधुनही सापडत नसलेल्या
अर्ध्यामुर्ध्या कवितांना...

ही ओळ
विविध प्रकारच्या पत्रव्यवहारातून निसटून गेलेल्या
उत्स्फूर्त ओळींना...

ही ओळ
खोडून मारलेल्या निष्पाप कल्पनांना...

आणि ही-
पराकोटीच्या निग्रहाने माझ्या सोबत राहिलेल्या
अव्यक्त कवितेला !

***

विरामचिन्हे

उदाहरणार्थ ती सांगतात आपल्याला
अल्पवेळ थांबा थोडे थांबा पूर्णवेळ थांबा
गर्दी करू नका चिक्टूनका  फ  ट  कू  नका
कधी ती पोटात घेतात शब्दांना
कधी मोकळीक देतात आगाऊपणा करण्याची
कधी आक्रसून घेतात अर्थाला
तर कधी चकीत अरेच्चा भावनाविभोर अरेरे

पण मी म्हणतो
याची गरजच कायाय त्यांना
जरा समोरच्यावरही विश्वास ठेवा की

आणि ती म्हणतील तेच का ऐकायचे आपण
आणि तोच का रस्ता धरायचा नव्याचीही शक्यता असताना

त्यात
टाईप करण्यात वेळ किती जातो
आणि कॅरेक्टर्स कमी असतील
तर कविताही जात नाही लगेच ढगात प्रश्नचिन्ह

***

आदेश!

काल आपण जिवंत होतात का
असल्यास त्याचा अहवाल दोन प्रतीत सादर करा
नसल्यास
आपण निवर्तल्याचा विहित नमुन्यातील दाखला
स्वतः वरिष्ठांना सादर करावा
शुद्धिपत्र : अमुक तारखेचा, अमुक क्रमांकाचा, अमुक आदेश, अमुक परिच्छेदाच्या,
अमुक ओळीतील 'स्वतः' हा शब्द वगळून वाचावा.
प्रत- महालेखाकार मुंबई नागपूर यांना रवाना
इतर अनेक किचकट हुद्देदारांना आपोआप अग्रेषित

स्वप्नांची अनारकली भिंतीच चिणा
नौकरी किया तो डरना क्या?

***

नव्या नोकरास...

कार्यभार स्वीकारलास मध्यानपूर्व हे चांगले केलेस
अर्ध्या दिवसाची सीनिऑरिटीसुद्धा
उपयोगी पडते कधीकधी.
आता उठ आणि चहा प्यायला जा

येताना पान खायचे विसरून वाटेतूनच माघारी जा
पान चघळत पिचकारी टाकत परत येताना भूक लागेल म्हणून सरळ जेवूनच ये
नंतर खुर्चीत बसून हमखास झोपेसाठी कोणताही पेपर वाच; पब्लिसिटी डिपार्टमेंटमध्ये पेपरांना काय तोटा?

वेड पांघरून शहाणा हो
कामाचा विचार करू नकोस
चिंता करतो विश्वाची म्हणून कुढत बसू नकोस
साहेब आत बाहेर जाता-येताना सावरून बसायचं
तेवढाच शिष्टाचार त्यांना पुरतो
स्वच्छेने जर का उठून उभा राहशील
तर त्यांचा उजवा हात होशील
अर्धवट उठलास तर डावा!

वर जाण्याच्या सोप्या मार्गावरती मांड ठोक
साहेबांच्या मुलाचे ढुंगण धू, बूट चाट, पाय चेप बिनधोक साहेब खोकले तर कर विचारपूस
ते ओकले तर सत्वर फरशी पूस
साहेबांचा तोल गेला तर त्यांना आधार दे
गरज असेल तेव्हा बाईसाहेबांनाही साथ दे
तो तुझ्या कर्तव्याचाच भाग आहे हे विसरू नकोस
संबंधित आदेशासाठी जीआर धुंडाळत बसू नकोस
असे अलिखित संकेत नेमके ओळखायचे असतात
साहेब नुसते खाकरले
तरी त्यात असंख्य अर्थ दडलेले असतात.
हळूहळू चुगल्या लावणे, काड्या घालणे सुरू कर
ह्या द्वैताच्या मार्गाने पदोन्नतीचा मोक्षही जवळ कर.
कन्फर्म झाल्यावर उचल पेन अर्ज कर ठोक सही ॲडव्हान्स माग कर्ज घे भत्ते भरमसाठ
मग हप्ते बुडवत रहा
आज देतो उद्या देतो म्हणत राहा
आपल्या फायद्याची कामे तत्काळ कर
शासनाची मात्र
विलंबित एकतालातही करू नकोस
तर कायम प्रलंबित ठेव
निलंबित झालास तर भाग्यवान समज
स्टाफच्या आदराला प्राप्त होशील
आधी अर्धा नंतर पाऊण पगार नियमानुसार घेशील त्यानंतर रिइन्स्टेट तर होशीलच
पण सगळे ॲरिअर्स घेऊन
पुढची नोकरी मानाने जगशील अधिकृतपणे काम न करता!

निवृत्त?

निवृत्त झालो
निरोपाची भाषणे संपली
घरी जाण्यासाठी
स्टेशनवर आलो
गर्दीतून गाडीत शिरलो
चौथी सीट मिळाल्यावर
चिंतन सुरू करत शुद्धीवर आलो
आत चढताना खाल्लेल्या धक्यांनी
श्वास सुरळीत सुरू झाला
संबंध नसताना मिळालेल्या शिव्यांनी
पाय जमिनीवर आले
प्रवासताना आम झालो घाम आला
उतरला स्टेटसचा ताप
तशी धावत आली कविता आपोआप!

* * *

पुस्तका...

माफ कर,
निर्धार करूनही मी तुझे पूर्ण वाचन करू शकलो नाही.
जगण्याचा रेटाच असा होता की
सलग आणि निवांत वाचन अशक्य होते.
तुला अधुन-मधून तुकड्या तुकड्यांनी वाचताना
मागचे संदर्भ सुटू लागले.
शंभर सव्वाशे पानानंतर तर मागचे काहीच आठवेना,
पानांचा डोंगर इतका प्रचंड  की माझा निर्धार डळमळू लागला.

तू थोडे आधी हाती यायला हवे होते असे खूप वाटते आता
पण त्याला तसा काही अर्थ नाही.
फक्त तुझी माफी मागणे एवढेच आता हाती आहे.

तुझ्या लेखक प्रकाशकांचीही माफी .
कथानकातील लहान मोठ्या पात्रांची,
लेखकाने कष्टपूर्वक निर्मिलेल्या भावविश्वाची,

शाई, छपाईयंत्र, कागदाची आणि त्यासाठी बळी गेलेल्या झाडाचीही माफी.
तुझ्या पूर्ण वाचनाचा आनंद ज्यांनी घेतला आणि
आपले अनुभवविश्व समृद्ध करून घेतले त्या वाचकांची माफी,
संघर्षासाठी बळ देणाऱ्या तुझ्यातील प्रभावी संदेशाची माफी
तुझ्यावर लिहिणाऱ्या समीक्षकांची
त्यावर प्रश्न काढणाऱ्या शिक्षकांची,उत्तरे लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांची माफी.

तुझे तालिकाकरण आणि ग्रंथमोजणी
करणाऱ्या सदैव गरीब ग्रंथालय कर्मचाऱ्याची माफी.
तुझ्या अंगावरच्या डागांची,
मला ॲलर्जी असणाऱ्या वासाची,
वाळवीच्या चाहुलीची,
वाचकांच्या शेऱ्यांची,
खाली मारलेल्या रेषांची, पेन्सिलीच्या खुणांची,
दुमडल्याने फाटलेल्या कोपऱ्यांची,
सर्वांची अगदी हात जोडून माफी...

तुझा हात सुटत गेला माझ्या हातून हळूहळू
सिनेमातील प्रेमीयुगुलाच्या ताटातुटीसाठी वापरल्या जाणाऱ्या हातांच्या क्लोजअपसारखा...

तुला लायब्ररीत परत करताना
क्षणभर थोपटले मी तुला पोटच्या पोरासारखे
आणि सोडली तुझ्यावर कायमच्या निरोपाची मूठभर  माती,

ॐ शांती शांती शांती ...

* * *

समतोल

विचार म्हणाला
तू हुशार आहेस
मी खूश झालो

भावना म्हणाली
तू मूर्ख आहेस
मी रडू लागलो

कृती म्हणाली
हा घे पेन
मी लिहू लागलो

ज्ञानयोग म्हणाला
बुद्धी
भक्तीयोग म्हणाला
मन
कर्मयोग म्हणाला
स्वतःला कामात गुंतव.

डॉक्टर म्हणाले,
विचार भावना आणि कृती
हा त्रिकोण समतोल हवा...

ताओ म्हणाला
बसून रहा
जे. कृष्णमूर्ती म्हणाले
ज्ञाताच्या पलिकडे जा
हरारी म्हणाला
सगळा इतिहास नव्याने लिही
एकहार्ट टोले म्हणाला,
इतिहास अस्तित्वात नसतो...
कृष्ण म्हणाला,
तुम्हारा क्या गया जो तुम रोते हो?
बुद्ध म्हणाला,
अजून उशीर झाला नाही,
पुन्हा नव्याने सुरूवात कर!

मी सगळ्यांचे ऐकत गेलो
(त्यात स्वतःला काय म्हणायचे आहे,
ते विसरून गेलो...)

इतक्यात कोरोना आला
तो म्हणाला शववाहिनीसाठी नंबर लावून ठेव
आज ना उद्या उपयोगी पडेल.

मी मोबाईल उचलला
बायको करवादत म्हणाली,
जेव्हा बघावं तेव्हा यांचा फोन सुरू
मी आहे तोवर होईल तुमचं सगळंकाही ठीक
नंतर काय होईल कुणास ठाऊक,
आधी खाली जा आणि दूध घेऊन या चहासाठी!

***

विचार

सकाळी सकाळी एक विचार माझ्या मनात आला...
मी त्याच्याकडे नीट निरखून पाहिले
आणि माझ्या लक्षात आले
की हा काहीतरी गडबड करणार आहे,
कारण येताना तो चोरपावलांनी आला होता
आणि आता मुत्सद्दीपणाने माझ्याकडे पहात बसला होता
मी त्याला पुन्हा निरखून पाहिले,
माझ्या लक्षात आले की
हा मला नक्की भ्रमित करण्याच्या उद्देशाने आला आहे
मग मी त्याला अधिक महत्त्व न देता
किंवा त्यात गुंतून न पडता
काहीही न्याय-अन्याय करण्याच्या भानगडीत न पडता
निर्धारपूर्वक त्याला निघून जायला सांगितले...
पण तरीही तो जाण्याचे नाव काढीना.
मग मी श्वासावर लक्ष केंद्रीत करीत
स्वतःलाच त्याच्यापासून दूर करू लागलो
आकाश जसे ढगांच्या वर वर असते
तसा मी अधिक वरून त्याच्याकडे पाहू लागलो
तसतसे मला बरे वाटू लागले,
मोकळे वाटू लागले,
स्वतंत्र वाटू लागले...
आणि मग तोही क्षुद्र खुजा होत
मनाच्या विशाल आसमंतात विरून गेला...
इतका की,
तो विचार काय होता

हेही मला आठवेनासे झाले
मी स्वतःवरच खूश झालो
त्या विचाराच्या मनात काय होते,
तो कसा मला भ्रमित करू पाहत होता
आणि मी त्याला कसे परतवून लावले
ही प्रक्रिया अगदी व्यवस्थित माझ्या लक्षात आली.
मग स्वतःचे कौतुक करत,
स्वतःची पाठ थोपटून घेत
आणि आनंदाने भरून, खूप समाधानाने
समतोल वृत्तीने
मी माझ्या  कामाला लागलो...

***

लता

तू धावत राहिलीस मुळातली शक्ती
फाद्यांच्या टोकात संक्रमित करत पुनःपुन्हा...

सूर्यकिरणांच्या स्पर्शासाठी
ताणलीस शक्ती अपरिमित
लोखंडी जाळीतून काढलीस मान बाहेर
सिमेंटच्या भिंतीतील फट शोधलीस आधाराला
नव्या उमेदीने.

गॅलरीच्या तुरुंगातून पाहात राहिलीस
दूरवरच्या उन्हाचे संजीवक विभ्रम
आणि त्याचे हलते त्रिकोण चौकोन काटकोन
आशाळभूतपणे पुनःपुन्हा.

शोषलेस पाणी माती खत
आणि एखादा कटाक्ष प्रेमाचा,
मालकीणीचा कधीतरी!

भैय्याच्या हातगाडीवरून
पलॅस्टिकच्या पिशवीतून आलीस कुवारी
नवजात वधूसारखी

बालपणी नर्सरीत मिळालं तेवढच ऊन...

अखंड झाकोळानं तुला तसं कुटुंबाला घेरलं
उन्हाच्या कवडशांना हाकारता हाकारता
साऱ्यांच्या जगण्याचं हरितद्रव्य कुंडीतच थंडावलं.

वेटोळे घालत चढलीस
अश्रूंची पानं ढाळलीस
वाऱ्यांशी भांडलीस मुळांनी गहिवरल्या...
फांद्यांची बोटं मोडलीस
नशिबाच्या कानशिलावर

भोगलास शाप अंधाराचा
मुळातल्या मुळात आकसत जात,
उन्ह तुझ्यापर्यंत पोचू नये
अशी सृष्टी घडवणाऱ्या
पोटार्थी अभियंत्याला केलंस माफ

पाहिलास चिमण्यांचा थवा भरारत जाणारा
आकाशाच्या इवल्या तुकड्यातून,
समोरच्या इमारतीतील पिंजऱ्यात
ओरडणाऱ्या पोपटाचा स्वरही
होता तुझ्या वेदनेचा साक्षीदार...

तुझं स्वप्न होतं फक्त कोवळ्या उन्हाचं,
हिरव्या मायेवरच्या शुभ्र सुगंधी चांदण्याचं.

वाळलीस पूर्ण
तेव्हा तुझ्या पानांचा चुरा करून
फुंकला आठवणींच्या आसमंतात प्राणपणाने
मृत्योर्मा अमृतं गमय...

***

## गुहेत

जाग आली तेव्हा कळलं
की आपण स्वप्न बघत होतो.
सुटकेचा निश्वास टाकला
तेव्हा लक्षात आलं की
आपण स्वप्नातच जागे आहोत...

जागेपणी स्वप्न बघतोय
की स्वप्नातल्या झोपेत जागतोय?

जागेपणातील नेणीव खरी
की झोपेतली जाणीव खरी
स्वप्नातल्या स्वप्नातल्या स्वप्नात
जागृतीतल्या जागृतीतल्या जागृतीत...

प्रश्नांच्या भोवऱ्यात
भोवंडतो अवकाश
कधी तळाशी कधी आकाशी
कधी डावीकडे कधी उजवीकडे
कधी
माहीत नसलेल्या दिशा,
अज्ञात परिमाणे...
आपला आधार कुठाय ?
आपला भोज्जा कुठाय ?
आपला श्वास कुठाय ?

जागृतीतून
सुषुप्तीततून
पुनःपुन्हा अस्वस्थतेच्या गुहेत...

***

मी आणि तू

इतके दिवस कुठे होतास ?
मी तर तुझ्याबरोबरच होतो.

मग मला दिसला कसा नाहीस ?
दिसणे आणि पाहणे यात फरक असतो.

माझ्याशी कधी बोललासुध्दा नाहीस ?
बोलायला तुलाच फुरसत नव्हती.

तुझं गाणंही मला कधी ऐकू आलं नाही ?
तू फक्त स्वत:च्याच गाण्यात मग्न होतास.

माझ्यावर संकटं आली तेव्हा कुठं होतास तू?
नीट आठव अशावेळी मीच तुला सावरलंय

आणि मी सुखात लोळत होतो तेव्हा?
मी तिथं, आधीच होतो हे लक्षात घे.

मी या जगात नसेन तेव्हा तू कुठे असशील ?
तू जिथं असशील तिथं.

भेटू या पुन्हा, मला कामावर जायचंय
आता `तू` कामावर जाऊ शकत नाहीस

म्हणजे, काय म्हणायचंय नेमकं तुला ?

येथून पुढे 'मी' कामावर जाणार आहे
आणि 'तू' माझ्याबरोबर असणार आहेस!

***

होडी

आधी एक चतकोर कागद घे
त्याच्या समान अशा चार घड्या घाल
त्यातली एक घडी
मन पूर्णपणे एकाग्र करून उलटी फिरव
मग आतून अंगठा घालून तिरकी दुमडून
वरून दाबून सपाट कर
त्यानंतर दोन्ही बाजूची टोकं
दोन्ही बाजूला अलगद ओढून
वरून पुन्हा दाब दे...

अशी तयार झालेली होडी
तळहातावरच्या समुद्रासह
तुझ्या वारसांना दे,
किती सोपंय सगळं हे ओळख!

***

होडी - २

आले स्टेशन जेजुरी
अडले चिंतनाचे पाणी गडाच्या बंधाऱ्याला
'वॉटर'च्या नळाखाली कमंडलूने नाहतोय बुवा
थंडीत निर्विकार
त्याचा जय राम श्रीराम पंचा वाळतोय झाडाच्या फांदीवर
दिक्कालातीत निशाण होऊन...

हातात नागपुरी संत्रे धरून
पाहतो मी ट्रेनच्या खिडकीतून
निंबोणीच्या झाडामागून सरकत जाणारा जेजुरीचा कळस
एकीकडे भाविक कुटुंबापाशी बडव्यांची हिंस्र लगट

सरकते गाडी हळूहळू
अध्यात्मिक विचारांचा शोभादर्शक
अपूर्व प्रतिमाभास दर्शवत बदलू लागतो
पाऊण परत दक्षिणा घालीपावेतो

खंडोबाचा डोंगर देवळासकट
तिसऱ्या डोंगराआड सरकत जातो स्लायडिंग डोअरप्रमाणे

जेव्हा मी सोलतो साक्षात्कारी संत्र्याची ढळढळीत साल
आणि द्वैताची भरड जाळी फेकून देतो
तेव्हा गाडीने वेग घेतलेला असतो
पण मागे पडत जाणाऱ्या गडाच्या बंधाऱ्यापाशीच
माझ्या आंबट गोड केशरी होडीने
नांगर टाकलेला असतो!

***

जात

जातीच्या सुताची सुंदर शिडी करून
लगबगीने सुखाच्या स्वर्गात जावे
अभावाचे बळ वापरून
भूतकाळाच्या तलवारीने गळे कापत गळा काढून
व्यवस्थेच्या गालिच्यावर बिनधास्त लोळावे

जात तोलत तराजूत हिशेबी जू खांद्यावर घ्यावे
अमुक इतक्या समृद्ध संस्कृतीचे निर्व्याज बैल बनून
जातीच्या मुद्दलावर शैलीदार व्याज कमवावे.

जातीची घेऊन ढाल
तिरंगी शाल घेऊन निवडणुका लढवत विजय होत
अंथरूण पाहून बलात्कार करीत पाय पसरावे
गावोगावी कर्फ्यू लावत बेरकी हसून पुन्हा उठवत
प्रमाणित कुळ्यांशी खानदानी इमान राखावे

जातीच्या हाडाच्या लेखणीच्या करामती करत
वारसावी पिढी नवी
सुंदर मांडलेल्या गोंधळाला येण्याचे आवाहन करत
दुरूनच अराजकाची दक्षणा उचलावी

माणुसकीच्या मंगलमय अंधाऱ्या जंगलात सुखरूप व्यवस्था प्रसवावी
नि:संदर्भ नव्या प्राण्याच्या कोवळ्या कपाळावर विधीपूर्वक जात पिळावी...

आजोळ

ती घसरणीची वाट आहे अजून मनात तशीच ओली ताजी
जिच्यावरून फिरले माझे कोणी त्यांना शोधत अखंड
पावलावर पाऊल पडावे त्यांच्या कुठेतरी एखादे म्हणून
केलेली निरागस भटकंती प्रत्येक दगडावर ठोकत लोखंड

मनात तसेच उरलेत अजून जांभे दगडचिरे घरांचे विहिरींचे
उथळ विहिरीतील जिवंत पाण्याचे चूळचूळ झरे
आणि त्यांच्या तोंडाशी निजून रांगेने अर्धवट भरून
खटर-खटर आवाज करीत वर येणारे टिपळूणी पोहरे

डोक्यावर पाऊस झेलणारी, प्रकाश गाळणारी,
दिवसा अंधार करणारी झाडं,
सोशिक मष्णवटा, फांदीवरच फुले फुलावी तशा वाटेला थेट सुगंधी वाटा
कालवणांचे, नव्या कपड्यांचे, खाऊच्या पुड्यांचे, बाळंतपणाचे वास...
खरपूस भाकऱ्या,फणसाच्या भाजलेल्या आठळ्या
आणि जमिनीला पाठ टेकलेल्या म्हाताऱ्या खाटा...

आंब्याच्या खूप झुकलेल्या प्रेमळ सोयीस्कर फांद्या मामाच्या खांद्यासारख्या
स्वागतशील सहिष्णू लोंबकळण्यास अतियोग्य मुलांना सालोसाल घरोघरी
डोंगर उतरती घरं कौलारातून गडद धुराच्या गर्द रेघा निळ्या आकाशावर मारणारी फणसाची काजूची झाड
अनंताची फुलं अबोली सोनटक्क्याची धुंदी सदाफुली...

गोऱ्या घाऱ्या उंच काळ्या स्फोटक मायाळू गर्विष्ट मतलबी प्रेमळ खुनशी
लग्नाच्या बिन लग्नाच्या अशा तशा माम्या मावश्या काक्या
त्यांची दादागिरी नखरे लांबच्या आज्या पणज्या आत्या बहिणी रंजक प्रत्येकीची कहाणी
विशेषतः त्यांचे बिलंदर भटके चतुर बेवडे छा छू गोसावडे नवरे!

डोईवरून पाणी आणणाऱ्या टवटवीत पोरींची उत्फुल्ल ओली पावलं
जांभळ करवंद कैऱ्यांना तिखट मीठ लावून खात नदीत डुंबत पाखरीत भटकणं,
धुण्याचे पिळे मिरवत प्रेमळ खांद्यावरून स्वप्नाळू नजरेनं
कुणाच्याही लग्नात त्यांचं तितक्याच आपुलकीनं
'वल्या ग हळदीचं' गाणं...

अंधाऱ्या कोपऱ्यातील नवथर मिठ्यांचे चुकार दर्शन
प्रेमचिठ्ठ्या पोचवण्याचा थरारक दूतावास

बालपणातील पुरुषत्वाची ओझरती जाणीव देत प्रेमाच्या अंकुराला रोमँटिक प्रतिसाद देणाऱ्या उमलत्या कळ्यांच्या निष्पाप सहवास!

काळाचे जलदगती सरकते पडदे शेंबडी पोरं सुंदर पोरी
त्या पोरींनी दुसऱ्या सुंदर पोरी प्रसवून सुंदर माहेरवाशिणी होणं
कुणाचं सस्मित गूढ स्वगत ऊवा मारत भावविभोर टपोऱ्या डोळ्यांच्या
अल्पायुषी सवंगड्याशी खेळलेली कबड्डी आठवत राहणं...

रात्री वराती, तोंडातून पेटत्या मशालीवर रॉकेलनं हवेत जाळाचा चित्तथरारक खेळ
तलवारी दांडपट्टा बाणे मधूनच भडकणाऱ्या गॅसबत्त्या
सुटतील असेच पेच टाकत रंगवायच्या कुस्त्या खेळता खेळता
पिढ्यांच्या पोटातून बाहेर पडणाऱ्या द्वेषाच्या जागृत गुप्त्या

पुरुषांनी दारू पिऊन गोंधळ घालत मासे आणि बायकांना मारत अधून मधून मुक्काम हलवणं
नव्या रात्री मनधरणी करत पुन्हा बायकांची नवंसृजन करणं
असं तुडुंब उकळतं चैतन्यशाली मातृसत्ताक रसायन
उतू जात जात स्थिरावलेलं
आजोळ माझं भटक्या बाल्यासह आयुष्याच्या लोहचुंबकाला बिलगलेलं!

***

लाहोरी

जेव्हा तू टाकलंस पहिलं पाऊल
या विश्वाच्या हिरव्यागार दीर्घ मखमली हिरवळीवर
तेव्हा तुझ्या निर्मळ डोळ्यात प्रतिबिंबीत झालं होतं
अपरंपार विश्वासाचं निरामय क्षितिज...

या असीम विश्वासाने
तू हळूहळू एकेका पावलावर तोल सांभाळत
लयबद्ध गतीनं पुढं सरकत राहिलीस
आणि अडकलीस अज्ञात फासेपारध्याच्या जाळ्यात
तुझ्या निर्मळ बेसावधपणासह

फासेपारध्याच्या हिशेबी प्रवासात
त्याच्या पाठीवरील पिंजऱ्यातून
संभवांच्या असंख्य डोळ्यांनी तू पाहत होतीस

अथांग आकाशाची वांझोटी पोकळी...

प्रवासाच्या अखेरच्या टप्प्यात
तुझ्याच प्रतिक्षेत असलेल्या या शहराच्या
भयंकर जबड्यात शिरलीस तू
पुन्हा त्याच निर्मळ विश्वासानं.

या शहराच्या बोथट संवेदनांच्या गजांवर
जेव्हा तू घासत होतीस आपली चोच निष्पाप कुतूहलानं
तेव्हा तीनमुंड्या प्राण्याच्या पायाखाली
अमानुषपणे गाडली जात होती स्वातंत्र्याची आणि माणुसकीची भाबडी स्वप्न.

रात्रीच्या जीवघेण्या थंडीत
निरागसपणे शिरलीस तू ज्यांच्या ओंजळीत
क्षणभराच्या आधारासाठी
त्यांनीच तुझी पिसं उपसून तुला नागडी केली
आणि खरपूस भाजली मसाला लावून
दुःखाच्या सर्जनशीलतेवर चविष्ट चर्चा करत करत.

स्वातंत्र्याच्या आणि चांगुलपणाच्या तुझ्या गाण्यासह
त्यांच्या विश्वात्मक भुकेच्या पोटामध्ये
तू गडप झालीस लाहोरी
त्यांच्या तृप्त झोपेमध्येही
तुझंच स्वप्न होतं... मसालेदार!

***

गोड घास

तू समजतोस ते चटके संसारतापाचे नाहीत
तर खरोखरच तुला कोणीतरी भाजत आहे खरपूस.
हे एकदा मान्य केलेस की लक्षात येईल तुझ्या
अधूनमधून तव्यावर उलटला जातोस तू
कधी कढईत उकळला जातोस
कधी भट्टीत वापरला जातोस
तर कधी रसरशीत निखाऱ्यात फुलवला जातोस...

तुला जे सुख म्हणून वाटतं ते असतं
तुझ्यावर अधून मधून शिंपडला जाणारा मसाला
तू अधिक चविष्ट व्हावास म्हणून
आणि तुला जी ओल जाणवते आशेची खोलवर
ती म्हणजे लाळ असते सुटलेली
जो तुला खाणार आहे त्याच्या जिभेला!

आता अज्ञात आतून एक टोकदार तार येईल
आणि तुझ्यात खुपसली जाईल
तू खुसखुशीत झालास की नाही हे पाहण्यासाठी

त्यापेक्षा स्वतःला भाजून घे निमूटपणे
आत आत हाडांपर्यंत
स्नायू वाफळ ढिले होईपर्यंत
नंतर गरम गरमच डायनिंग टेबलवर जा
फोर्कच्या चारा-बोटी परमेश्वर हो
चमच्याच्या पालखीत बसून
तुला खाणाऱ्याच्या दाढेखाली गोड घास हो!

***

पडला पाऊस...

पडला पाऊस झडींचा अडलं पाणी भरलं धरण यातनांचं
भिजली धरणी अबोध मनाची उमलले आठवांचे झरे
वाऱ्याने उडवले छप्पर पुन्हा, चहुअंगांनी आकाश कोसळले
आनंदाने तडफडण्याचे पुन्हा नव्याने दिस आले...

विद्वेषांचे श्यामल मेघ पुन्हा गरजले पुन्हा विजांचे
अंगांगावर चाबूक गाणे
पुन्हा रूजले बीज भयाचे जंगल पुन्हा वाढू लागले,
पानगळीचे, घुसमटण्याचे झुरण्याचे ऋतू आले
पुन्हा पुन्हा आनंदाने तडफडण्याचे दिस आले...

पुन्हा तापली दिवसाची चांदणी, रातीला सूर्य छळू लागले
आठवणींचे रक्तपाखरू पुन्हा धडपडू लागले

पुन्हा उसळली नवी वेदना दुःख निरंतर वाहू लागले
आनंदाने तडफडण्याचे पुन्हा दिस आले...

शापाचे जगण्याच्या आणि पुन्हा हरण्याचे
पुन्हा पुन्हा रूजण्याचे आणि कळीत खुडले जाण्याचे
पुन्हा पुन्हा वेडाचे आणि अखंड तांडवनृत्याचे
पुन्हा पुन्हा आनंदाने तडफडण्याचे नवे दिवस आले.

पुन्हा विषाचा प्याला हाती पुन्हा परीक्षा नवी
कापीत काळीज जाळीत हृदया तडफड रोज नवी
रोज नव्याने पुसून पाटी रोज नव्याने शिकण्याचे
पुन्हा पुन्हा आनंदाने तडफडण्याचे दिवस फिरून आले...

***

## भर दुपारी

भर दुपारी
शेताच्या बांधावर आंब्यांच्या सावलीत
दुरडीतून रूमाल काढलास तू
आणि आपल्या नाजूक हातांनी गाठी सोडत
तिखट-मीठ लावून दुमडलेली भाकरी
काढून त्याच्या हातात दिलीस,
त्याने फोडलेल्या
कांद्याच्या पोटातून बाहेर पडलेली
कळी पाहून
तू पोटुशी राहिलीस...

भाकरी खाऊन तांब्यातील पाणी
घटाघट पिताना
त्याचा वरखाली होणारा कंठमणी
तू अस्सा पाहात राहिलीस,
की तुझ्या नजरेचं मुलामय अस्तर
कायमचं लागलं
त्याच्या कष्टाच्या घोंगडीला...

त्याच्या मिशीत अडकलेला भाकरीचा कण
तू काढत होतीस तेव्हा
त्याच्या पिळदार दंडातल्या बेडकीनं
उडी घेतली
तुझ्या समंजस डोळ्यांच्या सरोवरात
आणि तेव्हापासून
त्याच्या पिकाला बरकत आली.

***

इच्छांच्या माथ्याला...

तुझा कृत्रिम डोळा ओलावतो
लाकडी पायाला अंकुर फुटतो
आणि पोलादी कर्णकुंडलं झुलायला लागतात
दक्षिण-ध्रुवापासून उत्तर-ध्रुवापर्यंत वेल्हाळपणे
पण तुझ्या सनातन अंतकरणाला
फुटत नाही पाझर थोडासुद्धा...

तुझ्या शिल्पित काळजातील
स्पंदनांचा आलेख
उमटतो माझ्या नेणीवेच्या शुभ्र कागदावर
आणि तुझा अनाहत ऐकून
तांडव करू लागतो माझ्यातला उद्यम-भैरव
पण ढळत नाही तुझ्या सुकुमार छातीवरचा भरजरी पदर
की वाहत नाही कोंडलेल्या श्वासाचं पाणी तीळमात्र
सखल भागातील करपत चाललेल्या पिकांच्या दिशेने...

धडालाच लागून असलेल्या तुझ्या
एक इंची हातातील पाच इंची चांदीची सुरी
नाही करत वार तरी अलवार चिरत जाते
माझे काळीज नित्य-नेमाने.

तुझ्या ओठांचं पोवळं आणि मोरपिशी सोवळं
माझी घसरती गाडी पुन्हा पुन्हा घेऊन जातं
इच्छांच्या माथ्याला...

कधी होशील प्रसन्न
आणि सांगशील तुझ्या प्राणप्रतिष्ठेचा विधी
माझा अवतार संपायच्या आत बये?

***

अभंग

त्याच्या डोळ्यातील चंचल पाऱ्यानं पोळले
तुझ्या स्वप्नांचे पंख वेळोवेळी
तरी त्याच्यासाठी धरलंस तू मायेचं छत्र
अखंड झालीस सावली
तुझं बोट कापलं भाजी चिरताना
विचारानं त्याच्या हिंसक तरी
तुझ्या लेकुरवाळ्या घरी
त्याची पालखी तू मुक्कामी राहू दिली

चुकवत काळजाचा ठोका,
त्याचा झोका आला धरणीवर नीट
अशा खळण्याच्या क्षणी झाले
तुझ्या डोळ्यात अश्रूंचे मोती
उन्हात मिसळणाऱ्या पावसाने
उलगडले दिवस रात्रीचे कोडे कितीदा
आणि अबोल्याचा अवाढव्य काळ
क्षणात झाला डोईत अबोलीची वेणी

सरकत्या काळाचे खंड कोलमडून
उसळल्या पाण्यानं झुलवले दोन्ही किनारे कितीदा
उधाणल्या अंतरात मिसळले विष
पुन्हा पुन्हा अमृताचे झरे फुलवत
शिव्या-शापांचे बाण धडकता परस्परांवर
उजळली आकाशातील तारकादळे आणि
शतशतकांच्या शहाणपणाने पुन्हा वाचली
इतिहासाची पोथी मिशीतल्या मिशीत हसत

विरघळताना वंशलोचन अभावाचा विळखा
राहिला शेपटीवर उभा

सुसंस्कृतपणाची कात टाकत सळसळले
तुझ्या परंपरेचे साळसूद अंग-प्रत्यंग,
चांदण्याच्या गारूडानं उजळलेस
युगांचे अंतर अंतरीच्या ओलाव्याने
मागे टाकत भूतकाळाचा आसमंत
झपाट्यानं जोडत प्रीतीचा लडिवाळ अभंग...

***

शेजारची बाई

ही शेजारी बसलेली बाई कोण आहे तिचे आपल्याकडे
लक्ष नाही असे आपल्याला वाटते पण आपल्या
चुकलेल्या श्वासाची लय देखील तिच्या नजरेतून सुटत
नाही तिच्या साडीवर आहे सुंदर वेलबुट्टी तिने स्वत:
चितारलेली जो तिचा खानदानी गूण साडी नीट धुवून
इस्त्री करून मॅचिंग ब्लाऊज घालून पर्समध्ये नीट चाव्या
ठेवून दूध फ्रीजमध्ये ठेवून रोजचे ऐहिक व्यवहार चोख
पार पाडून ती निघाली आहे कामावर तिच्या हातात आहेत
काही कागद आणि एक कॅलक्युलेटर जणू तिसरे अपत्य
ज्यावर चालतात तिचे हिशेब एकाग्रपणे मधूनच ती कागद
समोर ओढून टाकते त्यावर एखादा आकडा आणि खुशीने
सुरू करते पुढचे गणित आजुबाजूची गर्दी गोंगाट गडबड गोंधळ याचा तिला होत नाही काहीही त्रास
तिने स्वीकारले आहे जगणे पूर्वसुरींच्या निती-नियमांनुसार
चौकटींनुसार व्याखांनुसार ...
तिला येत नाही संशय चौकटी घडवणाऱ्या धुरीणांच्या मुत्सद्देगिरीचा
किंवा अधिक खोलात जाऊन माहिती घेण्याइतपत वेळ नाही म्हणा तिच्याजवळ
तिच्या शिस्तबद्ध जीवनशैलीत एक अखंड समाधान नियंत्रित स्थितीचे मिळाले तिला
की बाकी काही असण्याची गरज नसते
आपल्या फूटपट्टयांनी पाहते ती जगाकडे
आणि समोर जसे चालते तसेच चालते माघारीही यावर अढळ विश्वास असतो तिचा
माझ्या शुचिर्भूत असत्यांचे हातरूमालही ती
निर्लेप मनानं धुवून वाळत घालते नि:संशय खोलात न
जाता दोन अधिक दोन बरोबर चारच्या ताळ्यावर असतो
तिचा भरवसा तिला नको असतात भावनांचे छक्के पंजे कढ एवढ्या अत्यल्प भांडवलावर
सुफळ संपूर्ण जगत असते ती शेजारी बसलेली बाई!

मासा

संथ निळ्या पाण्याच्या पडद्यावर
मोरपिसाची शुभ्र तरंगती काडी
तेथील तरंगांची सूक्ष्म वलये
तुझ्या एकाग्र चित्तावर प्रतिबिंबित होणारी...

तंगुसाचा ताणेदार प्रवास
नाकासमोर
मोरपिसाची अकस्मात डुबकी...

आता दे झटका, उडव सटका,
लाव जोर, घे आधार खडकाचा
लाव पायाचा रेटा, सांभाळ घोटा...

हा बघ आला मासा पाण्याच्या बाहेर
पकड अस्सा, शाब्बास !
फडफडतोय बघ कसा,
गळ आतपण जात नाही
आणि बाहेरपण पडत नाही म्हणून.
कमाल केलीस
तू किती जातीवंत शिकारी
हे दाखवून दिलंस पहिल्याच प्रयत्नात...
आता तंगुस हातात धरून गोल गोल फिरवत
आपट खडकावर त्याला... एकदा, दोनदा, तीनदा
कसा तडफडतोय बघ...

आता घे हातात उघड त्याचं जाभाड आणि
उपस गळ तुझ्या लालस क्रौर्याने.

तुझे हात मात्र लयी सुकुमार पोरी
त्या गोंडस ओंजळीच्या पाशात
सोडतोय बघ तो प्राण
तुझ्याच घास होण्यासाठी...

चित्र

कोणी काढून नेलं ते चित्र ?
का त्या मुलानंच
चित्रातून बाहेर पडून
फाडलं स्वत:लाच ?
या विचारानं
तिथली कोरी चौकोनी मोकळी जागा
धाऊन आली अधिकच आक्रमकपणे
तुझ्या अंगावर ?

तू उठलीस आणि फिरवलास
त्या रिकाम्या चौकोनावरून तुझा हात निर्विकारपणे
आणि मग बाहेर पडलीस मनाची पाटी कोरी करून
काही घडलंच नाही अशा पद्धतीनं...

हा जर असता एखाद्या
बॉलीवूड स्टाईल चित्रपटाचा शेवट तर !

तू काढलं असतंस त्या मुलाचं चित्र आपल्या
पर्समधून बाहेर आणि पाहात बसली असतीस
मोठ्या प्रेमानं आणि पाहता पाहता
त्यात तुझा चेहरा डिझॉल्व होत
झाला असता या शोकांतिकेचा `द एण्ड`...

पण हा तर होता
तुझ्या नव्या नाटकाच्या सुरूवातीचा
जुनाच शेवट...

***

स्पंदनांच्या अल्याड-पल्याड

सलाईनचा थेंब
विश्वरूप होऊन ठिबकतो रित्या क्षणांच्या ओंजळीत
आणि हिंदळते जीवनेच्छा संभ्रमाच्या तृष्णेकाठी...

धुके आहे दाटलेले
भविष्याच्या माथ्यावर
आणि निष्पाप,
नम्र गवताच्या पात्यावरील दवबिंदूत
अडकलेय इच्छांचे आकाश...

अनोळखी झालेली वाट
होतेय अधिकाधिक धूसर
आणि अंधाऱ्या दरीच्या टोकावरून
ढळताहेत रानजाईची निस्तेज फुलं...

स्पंदनांच्या अल्याड पल्याड
पंखाची मिटीमिटी थरथर,
तळातील अंधारात प्रार्थनेचे तरंग
आणि अखंड पाजळणारा दीप अंतर उजळसाठी...

***

निष्प्राण अंगाई

उत्तर ध्रुवावरचे चकाकते शुभ्र निळे हिम
आणि दक्षिणेचा षण्मासिक डोह-काळिमा
या दोहोंच्या मध्ये सततच्या हुंकाराचे
साडेसत्तावीस अंशांनी कललेले धुके...

चंद्राची सदा दुर्लक्षित अर्धी बाजू
मांडते उभा दावा
प्रकाशित अर्ध्या बाजूशी अनादी-अनंत ...

नव्या आकाशगंगेच्या संभवात
हं आणि हूं चा संम्मीलित हुंकार
सुसाट शिरतो ओंकाराच्या कृष्णविवरात
आणि पुन्हा जन्मतो
अधांतरी स्थिर असणाऱ्या
नासदीय सुक्ताच्या निराधार मांडीवर
युगानुयुगाची निष्प्राण अंगाई होऊन...

हद-बेहद

हद आणि बेहदच्या अंधाररेषेवर
चमकली साक्षात्कारची वीज क्षणभर,
त्या मायावी मार्गाने
एकामागोमाग एक घरंगळत जाणाऱ्या
दोन थेंबांनी धरला द्वैताचा शॉर्टकट
आणि त्या अगम्य धावपळीत
एक अलीकडे पडला, दुसरा पलीकडे ...

त्या थेंबांतून फोफावला भ्रमाचा अजस्त्र वृक्ष पुन्हा
ज्याच्या मुळांनी मातीखालून परस्परांना घट्ट धरून ठेवत
लॅमिनेट करून घेतले आपापल्या सातबाराचे गर्भार रेकॉर्ड

हे टिपणारा कॅमेरा मागे मागे जात राहिला
तसतसे हद - बेहदचे क्षेत्र होत गेले सूक्ष्मातीसूक्ष्म
आणि हळूहळू अंतर्धान पावले
पाटी पुसून पूर्ण कोरी करावी तसे.

मग काळाच्या मास्तरांनी
मिशीतल्या मिशीत हसत
स्वाक्षरी केली नापास मुलांच्या प्रगती पुस्तकावर
आणि तंबाखू चोळायला घेतली
युगांच्या निर्विकार शहाणपणाने!

***

ढग

आपल्या संदर्भसंपन्न अभ्यासिकेत
निवांतपणे वाचत बसली होती ती,
आपल्या आवडत्या कवीच्या कविता...

सहज नजर वर करून
तिने समोर पाहिले
तर खिडकीत एक ढग तरंगत उभा!

तो तिला म्हणाला,
'काही फोटो काढू का तुझे?
कविता वाचता वाचता
तूच कविता होऊन गेली आहेस अगदी...'

ती म्हणाली,
आधी आत येऊन बैस,
मी तुझाच विचार करत होते आता,
फोटोग्राफी करतोस का हल्ली?'

ढग बिचकत बिचकत आत गेला
आणि तिच्या हातातील पुस्तकावर टेकला.
त्याने विचारले
कुणाच्या आहेत ग या कविता?
तेव्हा दूर आकाशात सळसळणारी
विजेची नागमोडी रेघ
तिच्या डोळ्यात प्रतिबिंबित झाली.
आणि
त्या रेघेने भारित झालेला ढग
तिच्या हातातील पुस्तकावर
बरसत दिसेनासा झाला ...

ती खुळ्यागत पानामागून पाने उलटत
त्याला शोधत राहिली कवितासंग्रहाच्या पानांत
आकांताने...कितीतरी वेळ!
अखेर
खुणेचे मोरपीस घालून ठेवलेल्या पानावर
दिसला तो तिला पुन्हा एकदा
द्वाड मुलासारखा वाकुल्या दाखवत...

तिने त्याला कुशीत घेतले
तेव्हा त्याने दोघांची एक सेल्फी घेतली
मात्र क्लिक करण्याच्या क्षणी
ढगाचा आकार बदलून
त्याचे झाले एक निष्पाप कोकरू!

दोघेही एकमेकांकडे पहात राहिले बराच वेळ...

तिच्यात ढग होता आणि ढगात ती होती.
त्या साक्षात्कारी क्षणाने दोघेही अचंबित झाले...

तेवढ्यात खिडकीतून हवेची एक झुळूक आली
आणि त्या दोघांनाही लपेटून
आपल्यासोबत बाहेर घेऊन गेली...

उंच उंच जात राहिली आसमंतात
ती, तिचे पुस्तक, ढग, त्याचा कॅमेरा, कोकरू
सारे काही विरघळत पूर्ण नाहिसे होऊन गेले...

झुळूक आणखी वर गेली
संपूर्ण आकाशाला निळा रंग आला
आणि अखेर ती झुळूकसुद्धा
त्या निळाईशी एकरूप होऊन गेली!

त्यानंतर काळाचा एक ध्यानस्थ हात पुढे आला
आणि त्याने त्या निळाईसकट
सारेकाही पुसून पाटी कोरी केली पुन्हा एकदा!

***

नेणीवेतील फुलांची ओंजळ

तिच्या लडिवाळ पेट्रोल बॉम्बने
खाक केली त्याची नर्सरी
तेव्हा उरलीसुरली रोपे छातीशी कवटाळून
त्याने दुसऱ्या माळरानाची वाट धरली...

तिच्या मुलायम मुत्सद्दी बंदूकीतून
तिने झाडली मागून गोळी
आणि पुन्हा तीच सबबींच्या अंधाऱ्या गल्लीतून
सान्त्वनाची ॲम्ब्युलन्स घेऊन धावली...

उठवले जनावर तिने युक्तीने
डांगोरे पिटत मीडियाच्या चावडीवरून
आणि शिकारीतील वाट्यासाठी

बुभुक्षितांची गर्दी धावून आली...

गोष्ट सांगताना फिल्मी चाहत्यांना
शेवटी तिने नामी ॲक्टिंग केली
तरीपण नेणिवेत कोमेजल्या फुलांची ओंजळ
तिच्या कपाळावर दृग्गोचर व्हायची ती झाली!

***

पुतळा...

त्याला ती बाई
समोरून पाहिली तर वेगळी
मागून पाहिली तर वेगळी
बाजूने पाहिली तरी वेगळी दिसायची

म्हणून त्याने तिचा एक पुतळा तयार केला
आणि आपल्या स्टुडिओत त्यावर संशोधन सुरू केले...
हे जेव्हा तिला समजले तेव्हा ती समक्ष येऊन
त्याच्यासमोर निर्वस्त्र होऊन उभी राहिली!
तेव्हा तर ती अगदीच वेगळी दिसत होती.

म्हणून त्याने त्या पुतळ्यावर लाथ मारली
तर त्याचाच पाय मोडला!

***

ही अंधारी गुहा...

ही अंधारी गुहा पार करताना
आधी भेटतील काही वटवाघळं
रक्तपिपासू...
त्यांना जर  मिळाली नाही शिकार
तर शोषतात ती एकमेकांचे रक्त...

नंतर भेटतील काही हडळी
मुडदे उकरून खाणाऱ्या

जेव्हा त्यांना कांहीच मिळत नाही खायला
तेव्हा चघळत बसतात त्या आपलीच हाडं...

पुढे आहेत
आग ओकणारे काही राक्षस
ते करतात भस्मसात
जे जे समोर येईल ते ते.
पाठीमागून जाऊन बसलं त्यांच्या मानेवर तर
ती आग जाळू शकत नाही आपल्याला
एवढं लक्षात ठेवायचं!
पुढे एक मोठा खंदक आहे
त्यात आहेत भुकेलेल्या असंख्य मगरी
सावज गिळतानाही त्या कायम रडत असतात
हे विसरायचं नाही.

एकेकीच्या नाकावर पाय देऊन
क्षणार्धात पुढं जाता आलं तर
मग पुढे भेटतो उघड्या तोंडाचा एक ढेरपोट्या पुतळा
पन्नास पायऱ्या चढून त्याच्या जिभेच्या
पोचावं लागतं त्याच्या तोंडात
पुढच्या रस्त्याला लागण्यासाठी.

त्या पुतळ्याचं पोट कधी भरत नाही...
नवं सावज आल्यावर निरखून पाहतो तो,
आजमावतो भक्ष्याचं पोषणमूल्य,
ते खाण्यालायक झालंय की नाही
याची खात्री करून घेतो...

आणि मग गिळू लागतो सावज
त्यालाही कळणार नाही अशा पद्धतीने.

ह्या अंधाऱ्या गुहेला
दुसरं टोकंच नाही
आणि हा प्रवास किती निरर्थक आहे
हे तिथं पोचल्याशिवाय कळतच नाही...

***

मी तूच!

प्रतिक्षांचे सप्तखंड
तडफडाटाचे सागर
नि यातनांच्या भराऱ्यांचं
दिगंत आकाश पेलत
सांभाळलं स्वत:ला
पुष्ट करत नेलं प्रत्येक वेळी नव्या युद्धासाठी

तुझ्या लडीवाळपणाची सुरी
फिरत राहिली मानेवरून पुन: पुन्हा

दूध तोडतात मुलाचं निर्दयपणे तसं तोडलं
तरी जोडत नेलेस संबंधांचे पूल
जन्मजात चिकाटीनं मला करत नामोहरम.

तुझी बेरीज तुझी बजाबाकी
तुझा गुणाकार तुझा भागाकार
प्रश्न तूच प्रश्नपत्रिका तूच
उत्तर तूच उत्तर पत्रिका तूच
तूच परीक्षक तूच विद्यार्थी मी तूच !

***

टायगर शो

वाघ आता कधीही दिसू शकतो.
हवा तेव्हा, हवा त्या वेळी, हवा त्या रूपात !

पूर्वी त्याला खूप शोधावे लागत असे.
तासन् तास फिरावे लागत असे,
मैलोन् मैल जंगल तुडवावे लागत असे.
कधी दिसला नशिबाने तर दिसला,
नाही तर कधीही नाही!
दिसला तर पहिल्या दिवशी नाहीतर
रिटायर होऊन गेला एखादा फॉरेस्ट ऑफिसर तरीही नाही...

तू मात्र अचूक नेम धरून तू ओढलास चाप
केलास त्याला बेशुद्ध
आणि बसवलीस त्याच्या पाठीवर शेपटीपाशी
एक मायक्रो चिप
त्याच्या हालचालींचा ठावठिकाणा सांगणारी.

आता ॲन्टेना हातात घेऊन
बाहेर पडलीस की
लगेच लागतो तुला त्याचा पत्ता.

आता घरात बसूनही पाहू शकतेस तू
त्याचे सारे व्यवहार
पाहू शकतेस त्याला
शिकारीचा विचार करताना,
दबा धरून बसलेला असताना,
सावज टिपताना,
फाडून खाताना,
शिकारीनंतर नखे साफ करण्यासाठी पंजे
मोहाच्या खोडावर ओरबडताना,
आपली हद्द घोषित करण्यासाठी
मूत्र विसर्जन करताना,
शेपटी आपटत गर्जना करताना...

त्याला पाहताना स्क्रीनवर
त्याच्या क्लोजअपमधील
लालसर जिभेचा खरखरीत स्पर्श
जाणवतो तुला तुझ्या गालावर
तेव्हा तू हसतेस
आदिम वन्य जमातीमधील
एखाद्या दिग्वीजयी सम्राज्ञीसारखी...

मनात आले की तू
आता करू शकतेस
`टायगर शो`...
तुझे निवडक पाळीव हत्ती
घेरतात वाघाला उद्दामपणे

आणि बसवून ठेवतात जागच्या जागी,
तोही आपल्या राजेपणाचा मुकुट
चाटून साफ करत बसतो जिभेने
जगाकडे दुर्लक्ष करत...

अशा वेळी पर्यटक वाघाला पाहतात
आश्चर्याने, मनसोक्तपणे,
त्याचे फोटो काढतात, चित्रिकरण करतात
कौतुकात भिजून जातात वाघ पाहिल्याच्या...
तुला धन्यवाद देतात.

वाघाच्या जाणिवेचा परीघ
सीमित झालाय आता एका मायक्रो-चिपनं
आणि त्याच्या स्वातंत्र्याची पताका
शरण आलेय तुला ॲण्टेनाच्या रूपानं.

तुझ्याकडे आता वाघाचे
संपूर्ण रेकॉर्ड आहे.
हवे तेव्हा तू त्याचे फोटो पाहू शकतेस
त्याचे चित्रिकरण कधीही केव्हाही
मागे पुढे करून पुनर्निमितीचा आनंद मिळवू शकतेस.
हवी ती चित्र चौकट हवी तशी ॲडजेस्ट करून
त्याच्या वर्तनाचा अभ्यास करू शकतेस.

हिंस्त्र प्राण्यांना हाताळण्याचे
तुझे कौशल्य वादातीत आहे
आणि तुझे वाघाविषयीचे प्रेम
वाघापेक्षाही अधिक हिंस्त्र...

तुझ्या रासवट लालसेचा पिंजरा
आणि नामशेष होत गेलेल्या
वाघाच्या दंतकथा गावोगावी पोहोचल्या आहेत.

आता वाघ कधीही दिसू शकतो !

***

थोडी मिसळ

थोडी मिसळ थोडा पाव
त्याला जीवन ऐसे नाव

तिखट थोडे कमी अधिक
किंवा कांदा जाड बारीक

काय फरक पडतो त्याने ?
अधूनमधून लिंबू पिळणे

मिसळीतील तर्री दर्शन
एक्स्ट्रा पावाला निमंत्रण

पिठाचे पावात रुपांतर
अवतरणारा परमेश्वर

आहार निद्रा भय मैथून
क्रिएटिव्हिटीचे सतत ढेकूण

रक्त  पितात  मनसोक्त
तेही मिसळ-पावावर आसक्त

आत्ताच देऊन आलो खांदा
वेटर, थोडा रस्सा लाना !

* * *

जसे आहोत तसे...

जीवनगौरव पुरस्काराच्या वेळी
एखाद्या माणसाला लोक स्टॅंडिंग ओव्हेशन देतात
तेव्हा मला उभे राहावेसे वाटत नाही.
असे बरेचदा घडते माझ्या बाबतीत.

मी जागच्या जागी बसून राहतो लोकांचे दडपण झुगारून.
त्या माणसाविषयी मला इतरांपेक्षा अधिक माहिती असणे

किंवा पूर्वानुभवाच्या आधारे
मी त्याच्या पात्रतेविषयी काही अनुमान काढू शकणे
यात माझा काही दोष आहे असे मला वाटत नाही.
मला माझे स्वतःचे मत असणे हा माझा  हक्क आहे आणि
त्याचे मी प्राणपणाने जतन केले पाहिजे असे मला वाटते.

शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देण्याच्या क्षणी
निवेदक म्हणतो की आपण साऱ्यांनी उठून उभे राहावे
तेव्हा मला त्याच्या आगाऊपणाचा प्रचंड राग येतो,
लोक स्वेच्छेने उभे राहिले तर त्यात पुरस्काराचा सन्मान,
मारून-मुटकून लोकांना उभे राहायला लावणे
हा उलट त्या 'सो कॉल्ड' मान्यवराचा अपमान आहे,
हे कोणाच्याच लक्षात येत नाही का?
अर्थात् अशा कार्यक्रमांमागील सुपारी लपून राहत नाही.

नाटक संपल्यावर 'कर्टन कॉल' देण्याची पद्धत हळूहळू
आपल्याकडेही रूढ होत आहे.
तेथेही  अशा प्रसंगी प्रेक्षक उभे राहतात.
नाटकातील पात्रांना नाटक संपल्यावर
काही क्षणांतच पुन्हा माणसात आणण्याची कल्पना
मुळात माझ्या पचनी पडत नाही.
त्यातून नाटक सामान्य दर्जाचे असेल
तर शेवटी असे उभे राहायला लावून
आपल्याला कोणीतरी शिक्षा करीत आहे
असे फिलिंग मला अशावेळी येते,
व्यक्तीस्वातंत्र्यावरचे ते अतिक्रमण वाटते मला.
अर्थात तेथेही मी उभा राहात नाहीच.

कोठे उभे राहायचे हे मला नीट कळते, उदाहरणार्थ
राष्ट्रगीताच्या वेळी मी मनापासून उभा राहतो.

नाटक-सिनेमा पाहताना लोक जेव्हा हसत असतात
तेव्हा मला हसू येतेच असे नाही,
लोक टाळ्या वाजवतात, तेव्हा ते टाळ्या का वाजवत आहेत
हेही अनेकदा माझ्या लक्षात येत नाही.
शासकीय, राजकीय,कार्पोरेट क्षेत्रातील कार्यक्रमात
उपस्थिताना टाळ्या वाजवणे किंवा हसणे भाग असते

कारण  साहेबांना किंवा मालकाला नाराज केल्यास
त्यांचे नुकसान होऊ शकते...
हे एकवेळ आपण समजू शकतो
पण आता एकूणच सार्वजनिक जीवनात
समारंभ - व्यवस्थापकांच्या प्रतिभेचा
आणि उपस्थितांच्या प्रतिसादाचा स्तर
कमालीचा घसरलेला दिसतो हे अमान्य करण्यात अर्थ नाही.
हल्ली तर - 'यासाठी टाळ्या झाल्या पाहिजेत,
त्यासाठी टाळ्या झाल्या पाहिजेत'
असे म्हणून निवेदक लोकांना बळेबळे टाळ्या वाजवायला लावतात.
वाहिन्यांवरील विविध कार्यक्रमात तर
रेडीमेड टाळ्या घुसडलेल्या असतात.
जगणे किती बेगडी आणि बधिर झाले आहे याचा
हा धडधडीत पुरावा नाही काय?

सिनेमा, नाटक, चित्र, शिल्प यांविषयीचे
छापील अभिप्राय मला तितकेच सावध करतात.
असे लेखन वाचत असताना
त्यामागील 'मांडवली'चे धागेदोरे उमगून मी अस्वस्थ होतो.
कर्त्याच्या सत्ता-संपत्तीची मिजास
किंवा करवित्याला होणारे विविध प्रकारचे लाभ त्यामागे दडलेले असतात.
अशा सहेतुक प्रसिद्धीमुळे
आपण हिरो आहोत असे स्तुती झालेल्या माणसांना वाटते,
त्या हिरोगिरीचा आब सांभाळण्याच्या नादात अशी माणसे प्रांजळ जगण्यापासून अधिक दूर जातात.

त्यांना अशा प्रकारे हिरो करणारे चाणाक्ष लोक
क्षणिक्-क्षुद्र लाभासाठी
कसदार आणि गुणवत्तापूर्ण समाजधारणेचे तत्व वेठीस धरत आहेत.
सवंग लोकप्रियता आणि निर्मळ दाद यातील फरक ओळखणे
दोन अधिक दोन बरोबर चार इतके सोपे नाही काय?

प्रेमाचा त्रिकोण आणि विवाहबाह्य संबंधांचे भांडवल असे विषय असणाऱ्या
कथा, कविता, कादंबऱ्या, सिनेमे, सिरिअली यांनी
समाजमनात अग्रभागी जागा मिळविलेली  दिसते
त्यामुळे  बाहेर पडलेला नवरा, बायको, मुलगा किंवा मुलगी
काहीतरी भानगड करूनच घरु परतणार असा भयगंड आज सर्वत्र निर्माण झालेला दिसतो...

आजच्या समाजाचे स्वरूप स्पष्टपणे सांगायचे तर
कलप लावून केस काळे करणाऱ्या म्हाताऱ्या नटीसारखे
'बीभत्स तरूण' झाले आहे.
जागतिक पातळीवर विविध क्षेत्रात आपली नाचक्की कशी होईल
यासाठीच जणू छोटे मोठे सुपारीबाज अटीतटीने प्रयत्न करीत आहेत.

माणसे मूर्खांच्या नंदनवनात कशी राहू शकतात,
हे माझ्या लक्षात येत नाही.
माणसे दुसऱ्याला का फसवतात ते माझ्या लक्षात येत नाही.
माणसे खोटे का बोलतात ते माझ्या लक्षात येत नाही.
माणसे लॉबिंग का करतात ते माझ्या लक्षात येत नाही.
माणसे हिंसक का होतात हे माझ्या लक्षात येत नाही.

आपण जसे आहोत तसे जगण्याची हिम्मत का दाखवत नाही माणसे?

निषेध नोंदवण्याची किंमत चुकती करावी लागते हे खरे आहे,
प्रसंगी गोळ्या झेलण्याची तयारी ठेवावी लागते हेही खरे आहे.
नोंद घेतली जावो न जावो,खटला उभा राहो न राहो,
निकाल लागो न लागो,
लागलाच तर तो विरोधात जाणार हे लक्षात घेऊन
विषाचा प्याला सोबत घेऊनच बाहेर पडावे लागले तरी हरकत नाही...

आपल्या जगण्याची संहिता
आधीच लिहून तयार असली म्हणून काय झाले?

* * *

आवरायला हवे...

चला
आपले आपणच आवरायला हवे आता...
(दुकान बंद करणे प्रत्येकाला अनिवार्य)

घाईघाईत
तिरडी बांधताना
काथ्या भिजवून घ्यायचे विसरलो
त्याच्या गाठी बांबूला नीट न बसल्यामुळे

खाली पडण्याची भीती शेवटपर्यंत सोबतीस राहिली

नाकातोंडात माती गेली
तेव्हा प्राणांतिक धडपड केली उठण्याची
पण तोवर लोक निघून गेले होते मातीसह भाषणे लोटून

प्लॅन बी
रेडी ठेवला आयुष्यभर
नोकरी टिकवण्याच्या खटाटोपात
अर्थातच सरणावर हात थोडासा हलला तर
मित्राने रिकामा केला त्यावर रॉकेलचा डबा तातडीने.

देहदानाची ॲम्ब्युलन्स
गेली सायरन वाजवत रक्तवाहिन्यांमधून
तो सोहळा जाहला अनुपम्य
आणि
मेडिकलच्या प्राध्यापकाने छेद घेतला छातीचा
तेव्हा काळीज थोडे हलले आतून

तेथे जिवंत असते कविता,
विद्यापीठात अभ्यासाला नसली तरी.

* * *

नागावकर गेले ?

महादेव नागावकर गेले तेव्हा त्यांच्याविषयी अनेक ठिकाणी
चुकीच्या बातम्या आणि लेख छापून आले.
तसा अंदाज त्यांनी खाजगीत बोलताना आधीच व्यक्त केला होता.
खरे तर आपल्याविषयी काही छापून यावे या मताचे ते कधीही नव्हते
नाहीतर त्यांनी तसा बायोडाटा, बातम्या आणि लेख
आधीच तयार करून ठेवले असते.

हल्ली काही लोक मरण्यापूर्वी आपल्या फोनची कॉलरट्यूनसुद्धा
लोकांच्या डोळ्यातून हमखास अश्रू ओघळावेत
अशा गाण्यावर आधारित ठेवतात
आणि मग त्यांचे चेलेचपाटे त्यावरही लेख वगैरे छापून आणवून

त्यांना अमर करण्याचा खटाटोप करतात.

नागावकर असल्या क्लृप्त्यांच्या फंदात कधीही पडले नाहीत.
ते समोर असताना त्यांच्याशी वादविवाद करणे अवघड जात असे,
म्हणून अनेकजणांनी त्यांच्यावर मरणोत्तर सूड उगवला, हे खरे आहे.
आपापल्या अज्ञानाचे पतंग उडवत अनेकांनी
त्यांच्या लेखनकर्तृत्वाची अक्षरशः वासलात लावली.

हे मुद्दाम नमूद करायला पाहिजे
की,नागावकरांच्या चाहत्यांनी पाठवलेल्या खुलाशांनाही
मीडियाने केराची टोपली दाखवली.

जे दिसते,लिहून येते तेच खरे असे आजही लोक मानतात,
विद्यार्थीसुद्धा परीक्षेत मार्क मिळवण्यासाठी
त्यांना जे शिकवले जाते तेच खरे मानून चालतात,
ज्यांच्याकडे शस्त्रे जास्त त्यांनी लढाई जिंकावी त्याचप्रमाणे
मीडिया ज्यांच्या बाजूला त्यांच्याच विचारांचा बोलबाला होताना दिसतो.
त्यामुळे नागावकर मेल्यानंतरही त्यांची बदनामी करावी
यासाठी त्यांच्या विरोधकांना फार कष्ट घ्यावे लागले नाहीत.

नागावकर यांची बाजू घेऊन लिहिणाराही एक गट होता, नाही असे नाही.
पण आपली कुणी बाजू घ्यावी हेही त्यांना आवडत नव्हते.

लेखन - मग ते कोणाचेही असो, त्याविषयी सडेतोड आणि न्याय्य भाष्य होणे
हे निकोप साहित्य आणि संस्कृतीच्या धारणेसाठी आवश्यक असते;
अशी त्यांची धारणा होती आणि ही गोष्ट मराठी विचारविश्वात घडणे
अशक्य आहे,असेही त्यांचे ठाम मत होते.
शिवाय हरणे जिंकणे,
शस्त्रे कमी-अधिक अशा संकुचित विचारांत
ते कधीच अडकले नाहीत.

जंगल निर्माण करायला एखादे बीज पुरेसे असते
मग ते कुठेही का पडलेले असो, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.
त्यांच्या साऱ्या निर्मितीप्रेरणा याच तत्वावर उभ्या होत्या.
आणि म्हणूनच उपरोध, उपहास किंवा अनुल्लेखाचे घाव बसूनही
नागावकरांचा उल्लेख वगळून साहित्य संस्कृती विषयक कोणतीही चर्चा पूर्ण होणे अशक्य आहे.

नागावकर मुळचे कुठले हेही अनेकांना ठाऊक नव्हते.
शिवाय प्रत्येक जिल्ह्यात नागाव नावाची पाच दहा गावे असतात,त्यामुळे लोकांचा गोंधळ उडत असे.

नेहमी फर्स्टक्लासमध्ये पास होऊनही त्यानी शेवटपर्यंत कधीही
आपली पदवी प्रमाणपत्रे ताब्यात घेतली नव्हती.
डोक्यावर ती विचित्र टोपी, अंगावर गाऊन आणि हातात डिग्रीची भेंडोळी
या फोटोचा त्याना भयंकर तिटकारा वाटत असे.

नागावकरांची  वैचारिक भूमिका अगदी पक्की होती,
आधीचे सारे नियम मोडून काढत ते असा युक्तिवाद करत
की समोरचा माणूस त्यांच्यासमोर निष्प्रभ होऊन जाई.
त्यामुळे विरोधक त्यांच्या विचारांचा प्रतिवाद न करता
त्यांच्या काही खाजगी भानगडी सापडतात का, याच्याच  शोधात अधिक असत.

या पार्श्वभूमीवर
'नागावकरांचा घटस्फोट'
हे प्रकरण शेवटपर्यंत खूपच चघळले गेले.
अर्थात नागावकरानी त्याही टीकेचा उपहास केला.
आपल्या घटस्फोटाचे वाभाडे काढणारे लोक
एकपत्नीत्वाच्या सक्तीने ग्रासलेले असून त्यांची मळमळ ते
टीकेच्या रुपाने  बाहेर काढत आहेत असे ते म्हणत.

नागावकर या आडनावावरून ते कोणत्या जातीचे आहेत
याचा पत्ता लागत नसे
पण तरीही ते जिथे जिथे जात तिथे तिथे त्यांच्या आधी
त्यांची जात जाऊन पोहोचलेली असे.
यामागील इंटेलिजन्स हा एक संशोधनाचा विषय असून
त्याचा पत्ता लागला तर ती बुद्धिमत्ता व्यवस्थित चॅनलाईज करून
राष्ट्राच्या गतिमान उभारणीसाठी तिचा नक्कीच फायदा करून घेता येईल
असे नागावकरांना वाटत असे.

नागावकरांनी जवळपास तीस वर्षे अध्यापनाचे काम केले,
असंख्य विद्यार्थी घडवले.
अर्थात शिकवणे,घडवणे,बिघडवणे यावर त्यांचा विश्वास नव्हता.
शब्दाला खूप मर्यादा असतात,
पुस्तकांच्या जंजाळात न अडकता
मनापासून अभ्यास करणारा माणूस ग्रेट असतो,

अनुभव हा सगळ्यात मोठा गुरू आहे,
निसर्ग सर्वांना समान पातळीवर आणतो,
यासारख्या आपल्या लाडक्या तत्वांचा ते वारंवार पुनरूच्चार करत.

त्यांनी स्वतः कधी पीएच.डी. केली नव्हती पण पीएचडीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा विशेष मान विद्यापीठाने त्याना दिला होता.
नागावकर कधी खुशीत आले की हा सन्मान माझा नसून विद्यापीठाचा आहे, असे म्हणत आणि दिलखुलास हसत.
प्यायला बसल्यावर तर हा विषय हमखास निघत असे.

तीन पेग, ही नागावकरांची मर्यादा होती
आणि ती त्यांनी कधीच ओलांडली नाही.
एखादी गोष्ट आपल्याला आवडली - विशेषतः बाई,
तर ती आपल्याकडे असायलाच पाहिजे असा सरंजामी विचार त्यांनी स्वप्नातही केला नाही.
उलट अशा स्त्रीच्या अस्तित्वाबद्दल निसर्गाचे आभार मानून
तिच्या सौंदर्याला दाद देण्याचा तो क्षण तसाच तेथे चिरंजीव होऊ देणे त्यांना लैंगिक आरोग्याचे लक्षण वाटायचे.
त्यांच्या या असल्या विचारांमुळे त्यांच्यासोबत प्यायला बसणेही अनेकांना अडचणीचे वाटत असे.

साहित्य, संस्कृती, कलेच्या प्रांतात
नागावकरानी कधी आपला गोतावळा निर्माण केला नाही.
अनेक तरुण तरुणी त्यांच्या तेजाने भारावून त्यांच्या मागेपुढे करायचे
पण त्यांनी परंपरा निर्माण होऊ द्यायला ठाम विरोध केला.
प्रसंगी अशा भाबड्या चाहत्यांना त्यानी वाऱ्यावर सोडून देणे पसंत केले,
त्यातच त्यांचे भले आहे असे ते वर म्हणत.

सत्कार, पुरस्कार, मुलाखती अशा बाह्योपचारांचा त्यांना तिटकारा होता
म्हणून त्यापासून चार हात दूर राहणे त्यांनी नेहमी पसंत केले.
अमर होण्यासाठी साहित्याचा साधन म्हणून वापर करणे
हा कृतघ्नपणा आहे असे ते स्पष्टपणे म्हणत असत.

नागावकर गेल्यानंतर तीन दिवसांनी त्यांची पहिली बायको
दुसऱ्या बायकोला भेटायला गेली
ही गोष्ट त्यांच्या दुसऱ्या बायकोला आवडली, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

घरात नागावकरांचा कपाळावर गंध लावलेला, हार घातलेला  फोटो आणि समोर मंदपणे तेवणारे निरंजन असा काहीही प्रकार नव्हता.
किंवा त्यांच्या बायकोने पांढरी साडीही नेसलेली नव्हती.

उलट तिने उपचार बाजूला ठेवून कांदेपोहे केले
पहिल्या बायकोने ते आनंदाने खाल्ले,
त्यांच्या गप्पाही रंगल्या.
पहिल्या आणि दुसऱ्या बायकोने नागावकरांच्या स्वभावाचे केलेले वर्णन
आणि सांगितलेल्या आठवणी इतक्या भिन्न स्वरूपाच्या होत्या
की खरे नागावकर कोणते याबाबत दोघींचा गोंधळ उडाला.
या गोंधळाच्या धाग्याने त्या दोघींना अधिक जवळ आणले,
इतके की चर्चा संपता संपता त्या जणू एकमेकींच्या बहिणी झाल्या.

भेट संपली तेव्हा दोघीही एकमेकीच्या कुशीत शिरून रडल्या.
नागावकर गेले म्हणून नव्हे,
तर ते आपल्याला नीट कसे कळले नाहीत या दु:खाने !
जे नागावकर आपल्या बायकोला कळले नाहीत
ते इतरांना कळणे ही तशी अवघड गोष्ट,
पण पूर्वाश्रमीच्या सवती भविष्यात मैत्रिणी होऊ शकतात हा दृष्टिकोन
जो समाज किंवा मीडिया लक्षात घेऊ शकत नाही
तेथे सत्याची नेहमी गळचेपी होणार,
आणि अशा समाजाचे भवितव्य
अंधारलेले असणार हे वेगळे सांगायला नको.

* * *

कवीपत्नीचा शोकसंदेश

ते काल रात्री झोपेतच गेले,
त्यांच्या इच्छेनुसार
देहदानाची प्रक्रिया आम्ही सकाळी पूर्ण केली.
संबंधित कागदपत्रे त्यांनी आधीच व्यवस्थित भरून ठेवली होती.
त्यांचे अक्षर चांगले असल्यामुळे यासंबंधी
कुणाचे काही कन्फ्युजन झाले नाही.

आपल्या कुटुंबियांचे सान्त्वन करण्यासाठी
कुणीही येऊ नये अशी त्यांची इच्छा होती,
त्या इच्छेचा साऱ्यांनी मान राखला पाहिजे.
एकतर आमचे घर लहान,
आणि ते स्वतः कधीच कुणाच्या सान्त्वनाला गेले नाहीत हेही तितकेच खरे.

इतःपरही त्यांच्या कोणी मित्राला यायचे झाले तर
देहदानाची प्रक्रिया संपल्यावर
आम्ही लगेच घराला कुलूप लावून  बाहेर पडलो आहोत
आणि परत कधी येणार हे सांगता येत नाही.

नुकतेच माझ्याशी बोलताना ते म्हणाले होते की,
दुःख व्यक्त करण्याची माणसाची वेळ आता
अगदी 'मायक्रो सेकंदा'वर आली आहे
त्यामुळे ज्या कुणाला वाईट वाटायचे असेल
ते जेवतानासुद्धा या बातमीमुळे विचलित होणार नाहीत,
फक्त अरेरे एवढे म्हणून पुढचा घास चवीने घेतील.

जन पळभर म्हणतील हाय हाय, यातील
पळ
या शब्दाचे आकाश प्रचंड आक्रसले आहे,
हे नाकारण्यात खरोखरच काय शहाणपण आहे?

ते चांगल्या कविता लिहायचे असे काहीजण म्हणतात,
मला त्याविषयी फार माहिती नाही.
अगदी स्पष्टपणे सांगायचे तर
मला त्यात काही इंटरेस्टही नव्हता.
पण कोणतेही लॉबिंग वगैरे न करता ज्याअर्थी
तज्ज्ञ लोक त्यांचे कौतुक करत
त्याअर्थी ते चांगले लिहित असणार असे म्हणायला वाव आहे.

त्यांची काही स्मृतिचिन्हे,मानपत्रे आणि
कवितासंग्रहाच्या कधीही विकल्या न गेलेल्या प्रती
जागेअभावी अडगळीत पडल्या आहेत.
एका स्मृतिचिन्हात चांदी असावी असा संशय असल्याने
मी ते बाजूला ठेवले आहे...
त्यांना एकदा एक गावठी जीवन गौरव पुरस्कार
बळेबळे देण्यात आला होता,
दोन तीन किलो वजनाचे ते भलेमोठे सागवानी स्मृतिचिन्ह
बदलीच्या वेळी सामान हलवताना
एखादा रोगग्रस्त अवयव शरीरातून काढून फेकून द्यावा
तसे आम्ही भंगारात टाकून दिले...
पुरस्कार देणाऱ्या संस्थांनी स्मृतिचिन्ह लहान

आणि पुरस्काराची रक्कम मोठी ठेवली तर ते अधिक व्यवहार्य होईल,
असे या निमित्ताने सुचवावेसे वाटते.

त्यांच्या अप्रकाशित कवितांबद्दल
किंवा त्यांनी त्या कोठे जपून ठेवलेल्या असतील
तर त्याबद्दल मला काहीही कल्पना नाही.
मात्र त्यांचे पॅनकार्ड आणि आधारकार्ड
मी नीट लॅमिनेट करून घेतले आहे आणि ते कायम माझ्यासोबत असते.

इतःपरही
ते कसे होते? या प्रश्नाचे उत्तर
हौशी मुलाखतकारांचा वेळ वाया जाऊ नये म्हणून
मी इथेच देऊन ठेवत आहे :

माणूस जसा असावा तसेच ते होते.
आणि हो,
सततची अस्वस्थता हा त्यांचा स्थायीभाव होता
त्यामुळे त्यांच्या आत्म्यास शांती लाभो असे मी म्हणणार नाही.
दांभिकपणाचा मला प्रचंड तिटकारा आहे.

* * *

'तुकारामसरां'च्या शाळेत...

: नमस्कार सर येऊ का आत?
: ये ये शाळा तुझीच समज, जय हरि विठ्ठल!
: थँक्यू सर.
: काय काम होतं?
: ॲडमिशन हवी होती...
: असं होय? नाव काय तुझं?
: अमुक अमुक
: वय काय?
: तमुक तमुक
: लग्न झालय का, मुलं किती, घरदार, पैसा-अडका,
पद-प्रतिष्ठा?

सरांनी सगळी चौकशी केली, शेवटी विचारलं

: सध्या काय करतोस?
: लेखन!
(येथे तुकारामसर थोडे विचारात पडले,
बहुदा ॲडमिशन मिळणार असं वाटलं.)

: एखाद्या माणसाचं दिवाळं निघालं
तो सर्वस्व गमावून बसला तरच आमच्या शाळेत ॲडमिशन मिळते हे माहीत आहे ना तुला?
: हो माहीत आहे, म्हणून तर आलो सर.
: बोल, तुझ्या नुकसानाची यादी सांग.
: कष्टपूर्वक लिहिलेली कविता आणि घर दोन्ही गेलं.
: आणखी?
: नाती तुटली, विश्वास तडकला, अपेक्षाभंग झाला,
जे जे मिळवलं ते ते बुडबुड्यांसारखं फुटत गेलं,
हे गेलं ते गेलं हे गेलं ते गेलं हे गेलं ते गेलं...
यादी खूप मोठी आहे सर. काहीच राहिलं नाही ...
: असं कसं,अजून बरंच काही शिल्लक आहे तुझ्याकडे,
ते जाईपर्यंत ॲडमिशन मिळणं शक्य नाही.
: असं करू नका सर?
: पण हा आमचा नियम आहे त्याला मी काय करू?
: जरा स्पष्ट करून सांगता का प्लीज?
: जे गेलं त्याविषयीची तुझी आसक्ती अजून कायम आहे,
मी कविता केली, मी घर बांधलं यातील 'मी' अजून गेलेला नाही,हा दंभ अजूनही कायम आहे तुझा,बरोबर की नाही?
: पॉईंट आहे सर तुमच्या बोलण्यात.पकडलंत तुम्ही मला.
: दंभ अहंकार जाऊदे सगळा, नंतर ये, देतो ॲडमिशन.
: असं करू नका सर खूप दमलोय, खूप फिरलोय...आता ताकद नाही राहिली अंगात.
: कुठं कुठं  फिरलास?
: हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारशी, जैन सर्व शाळांमध्ये गेलो पण कुठंच काही नीट जमलं नाही.
विपश्यना, मेडिटेशन, तपश्चर्या, अध्यात्म, तत्त्वज्ञान
हे अभ्यासक्रम अजिबात झेपत नाहीत सर,देव आहे देव नाही काहीच लक्षात येत नाही सर.दोन तीन ठिकाणाहून मध्येच पळून आलो. आता तुमच्याशिवाय कुणाचा आधार नाही.
: आधार घेण्याची कल्पना ही सुद्धा एक आसक्ती !
ती सोड, पूर्ण निसंग हो आणि मगच ये!
: (हात जोडत) मेहेरबानी करा सर... अभ्यास करता करता साईड बाय साईड होतो निसंग पण आता आणखी कुठे जायला सांगू नका.आणि एका ॲडमिशननं काय नुकसान होणार आहे तुमचं?आईशप्पथ खूप दमलोय सर.श्वास अडतो अधूनमधून, हृदयात धडधड होते...
: तू माझ्यापासून काही तरी लपून ठेवतोस हे लक्षात आलंय माझ्या...
: (कान पकडत) तसा मी खाऊन-पिऊन सुखी आहे.

मुलं ऑनलाईन का होईना पण चौकशी करतात, बायको दोन वेळ जेवायला घालते, मित्र चहा पाजतात,
काहीजण माझ्या पोस्टी वाचून लाईक करतात पण हे मी मुद्दाम सांगितलं नव्हतं तुम्हाला; ॲडमिशन मिळणार नाही या भीतीनं!

अशी कबुली दिल्यावर तुकारामसर मिशीतल्या मिशीत हसले आणि म्हणाले,
: बरं ये आत आणि बस त्या फटकुरावर...

: थँक्यू सर.

: पाटी पुस्तकं आणलीत का?
तुकारामसरांनी गुगली टाकली.

मी म्हणालो,
: काय चेष्टा करताय सर,
आता काहीच राहिलं नाही माझं या जगात,
'हे विश्वची माझे घर...'असं झालंय.
घरनं निघताना छत्रीसुद्धा घेतली नाही.

: बरं ठीक आहे, डोळे मिटून घे!
: घेतले.
: म्हण, विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल!

मी म्हणू लागलो,
: विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल!

तसतशी ओपन होत गेली हार्टमधली ब्लॉकेजेस,
श्वासही नीट सुरू झाला,गतिमान झाला...
अणुरेणूपेक्षाही लहान असणाऱ्या मला
आकाशाएवढ्या तुकारामसरांनी पोटाशी धरलं
अणू आणि आकाश जणू एकरूप होऊन गेलं...
तशी भावना मी लगेच व्यक्त केली.
तर
पुढच्याच क्षणी आतून आवलीमॅडम धावत आल्या
सणकन माझ्या कानाखाली देत म्हणाल्या,
"अशा काहीबाही कल्पना करत बसतोस म्हणून तुझ्यावर ही वेळ आली आहे, विचार,भावना आणि वर्तन
यांचा त्रिकोण समभूज असायला हवा माणसाचा
हे लक्षात घे!"

तुकारामसरांच्या शाळेतला
हा पहिला धडा...
मनाशी म्हटले,
चला ॲडमिशन तर कन्फर्म झाली!

***

वाऱ्याचे घर

वारा घर शोधत फिरत होता.
दऱ्याखोऱ्यातून, रानावनातून, समुद्रावरून,
घनदाट जंगलातून, उंचच उंच पर्वतरांगातून,
छोट्याछोट्या गावातून, मोठमोठ्या शहरातून...
सर्वत्र धडका देत, वळणं घेत, सुसाटत,फुफाटत
सैरावैरा फिरत होता...

सर्वांना तो सांगत होता,
"मला खूप फिरावं लागतं, भटकावं लागतं,
गरगर फिरावं लागतं,मार्ग काढत पुढं जावं लागतं, पोकळ्या भरून काढाव्या लागतात,
वातावरण खेळतं ठेवावं लागतं,
दमून जायला होतं, विश्रांती घ्यावीशी वाटते.
पण मला स्वतःला राहण्यासाठी घर नाही,
डोकं टेकण्यापुरती स्वतःची जागा नाही,
मी हे कुणाला सांगू, कुठे जाऊ, काय करू?"

त्याच्या या विचित्र मागणीनं
चराचराला धक्का बसला,आश्चर्य वाटलं,
त्याची समजूत कशी काढावी कुणालाच कळेना.

शहरातील उंच इमारती त्याला म्हणाल्या,
'आम्हालाच हातपाय हलवायला जागा नाही
तर तुला कुठे घर देऊ?'

बिल्डरने त्याला त्याचे बजेट विचारले
आणि 'स्क्वेअर फुटा'चा भाव सांगितला;
तेव्हा वारा अधिकच गरगरला, निराश झाला,
पुन्हा सुसाटत फुफाटत आकाशात घुसला...

मात्र समुद्र त्याला म्हणाला,
"तुझ्या अथांग मायेची मुलायम शाल
जी तू रोज माझ्यावर पांघरतोस
ती घे तुला...ये, बैस थोडावेळ माझ्या मांडीवर"
पर्वतशिखरे त्याला म्हणाली,
" इथे थोडा टेकून विश्रांती घे
आम्ही घाम पुसतो तुझ्या माथ्यावरचा,
फिरवतो तुझ्या पाठीवरुन हात"
झुळझुळ वाहणारी नदी त्याला म्हणाली:
"थांब थोडा इथे, मी काढते तुझी अलाबला -
कुणाची दृष्ट लागली तुला काही कळत नाही गड्या!"
वनरायांनी दिले त्याला आपल्या अस्पर्श छतावरील
कोवळ्या तुऱ्यांचे मुलायम गुच्छ आजीच्या सायस्पर्शाने
आणि पाखरांनी त्याचेच माध्यम वापरून त्याला दिली
आदिम संजीवक गाणी...

माळरानावरील चंद्रमौळी झोपडी त्याला म्हणाली :
"अरे हे सारे विश्वच तुझे घर आहे,
पटत नसेल तर घेऊन जा माझ्याकडचे
हे माझ्या गळक्या छपरातून खाली पडणारे
सोनेरी कवडसे,
जे मिरवते मी माझ्या अंगाखांद्यावर
आभूषणांसारखे..."

चंद्रमौळी झोपडीचे ते ढळढळीत शब्द -
बराचवेळ त्याचा पाठलाग करत त्याच्या मागोमाग
फिरत राहिले :
'सारं विश्वच आपलं घर' कसं काय असू शकेल बरं?
त्याने मनाशी खूप विचार केला,
मग हळू हळू तो शांत होत गेला.
'विश्वाच्या घरा'ची कल्पना त्याला पटली, छान वाटली.
त्या जाणीवेने जणूकाही सुगंधाचा एक नवा प्रवाह
त्याच्या अंतरंगातून उमलून वर येऊन झुळझुळू लागला...
वारा पुन्हा नव्या उत्साहानं फिरू लागला.
सारे चराचर सुगंधित झाले, नाचू लागले,गाऊ लागले...

तो जेव्हा वेळूच्या बनातून जाऊ लागला
तेव्हा जन्मलेल्या सुरांनी जागी झाली
झाडामाडातील पालवीची कोवळी लिपी,
आणि काळाच्या पाटीवर गिरवला गेला हिरवा धडा!

त्या बदलाच्या सामर्थ्याने वाऱ्याला आश्चर्य वाटले,
त्याने आपले चित्त आणखी एकाग्र केले
लक्ष श्वासावर केंद्रित केले
श्वासाला जणू तो शरण गेला;
वर्तमानक्षणात 'स्थित' झाला
आणि मग काय सांगावं महाराजा !
आनंदून तो स्वतःलाच म्हणाला :
Yes, there you are,
You have arrived,
You are at HOME ...

***

ताजा कलम:
पुढील भागातील कवितांचे काम सुरू आहे...
ते पूर्ण होताच या ठिकाणी समाविष्ट करण्यात येईल धन्यवाद!

***